

उरण : मत्स्यव्यवसायाला कृषी समकक्ष क्षेत्राचा दर्जा मिळाल्याबद्दल राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांचा शुक्रवारी करंजा येथे जाहीर सत्कार करण्यात आला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह कोळी समाजाचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि बंधू-भगिनी उपस्थित होते. (वृत्त उद्याच्या अंकात)

रायगड, नवी मुंबई

♦ वर्ष १७ ♦ अंक ३०६

www.ramprahar.com

# रामप्रहर

शनिवार, २४ मे २०२५ ♦ पाने ८ ♦ किंमत ₹२

# काँग्रेसच्या डोक्यात पाकिस्तानी व्हायरस

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा जोरदार हल्लाबोल

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

एक राहुल (आमदार राहुल आवाडे) अडीच किलोमीटर तिरंगा यात्रा काढतात, तर दुसरे राहुल (खासदार राहुल गांधी) विमाने कशी पडली? हल्ले कसे झाले, असे प्रश्न करतात. या काँग्रेसच्या डोक्यात पाकिस्तानचा व्हायरस आहे, असा हल्लाबोल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.




इचलकरंजी विधानसभा मतदारसंघातील ७१३ कोटींहून अधिक रुपयांच्या विविध विकासकामांचे उद्घाटन, शुभारंभ व लोकार्पण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. २३) करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

भारताकडे वाईट नजरेने बघणाऱ्यांना जशास तसे उत्तर दिले जाईल हे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दाखवून दिले. आज माझ्या माता, भगिनी या सभेला सिंदूर लावून आल्या आहेत. पहलगाम हल्ल्यात पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याचा बदला पंतप्रधान मोदींनी ऑपरेशन सिंदूरद्वारे घेतला. मसूद अहमद, हाफिद सईद यांच्या परिवारासोबत १०० आतंकवाद्यांना कंठस्नान घालण्यात यश आले, मात्र काँग्रेसने पहलगाम हल्ल्यावरून पंतप्रधान मोदींवर टीका करीत त्यांना प्रश्न केले, याकडे मुख्यमंत्री फडणवीस यांनी लक्ष वेधले.

काँग्रेसचे विचार हे पाकिस्तानने हायजॅक केलेत. या मूर्खांना माहीत नाही की, शेतीचे ड्रोन आणि युद्धाचे ड्रोन वेगळे असतात. या मूर्खांना आता कोण समजावेल? काँग्रेसच्या डोक्यात पाकिस्तानचा व्हायरस आहे. त्यांची हार्ड डिस्क करप्ट केलीय, पण हा नवा भारत आहे. भगिनींचे सिंदूर पुसले, तर आम्ही घरात घुसून मारू, असे मुख्यमंत्री म्हणाले.

# तळोजा परिसरात होणाऱ्या प्रदुषणामुळे एमआयडीसीतील रासायनिक आणि मत्स्यप्रक्रिया उद्योगांचे स्थलांतर करावे

## आमदार प्रशांत ठाकूर यांची उद्योगमंत्र्यांकडे मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा क्षेत्रातील तळोजा एमआयडीसी परिसरात मोठ्या प्रमाणावर वायू व जलप्रदूषण होत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर त्याचा गंभीर परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर परिसरातील रासायनिक आणि मत्स्यप्रक्रिया उद्योगांचे कायमस्वरूपी स्थलांतर करून त्यांच्यासाठी नवीन झोन तयार करण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे केली आहे.

या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी मंत्री उदय सामंत यांना निवेदन दिले आहे. या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, पनवेल विधानसभा मतदारसंघ अंतर्गत तळोजा एमआयडीसी असून त्यामध्ये अभियांत्रिकी कंपन्यांसोबतच अनेक रासायनिक तसेच काही मत्स्योद्योग प्रक्रिया कंपन्या आहेत. या कंपन्यांमार्फत मोठ्या प्रमाणावर वायू व जलप्रदूषण होत असून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला



आहे. तळोजा एमआयडीसीच्या चोहोबाजूंनी नागरी वस्ती मोठ्या प्रमाणावर वाढत असून त्यांना या प्रदुषणाचा खूप त्रास होत आहे. याबाबत मी सातत्याने पत्रव्यवहाराद्वारे, बैठकांद्वारे हा विषय शासनाकडे मांडत आलो आहे. या रासायनिक कंपन्यांमधून विशेषतः रात्रीच्या वेळी घातक वायू हवेत सोडले जातात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात हवा प्रदुषित होत असून नागरिकांना श्वसनाच्या गंभीर आजारांना सामोरे जावे लागत आहे. त्याचप्रमाणे या सर्व रासायनिक कंपन्यांकडून रसायनमिश्रित दुषित पाणी व सांडपाणी परिसरातील नद्यांमध्ये सोडले जाते. त्यामुळे नद्यांतील जैवविविधताही धोक्यात आलीय.

मत्स्योद्योग प्रक्रिया कंपन्यांकडूनही जल, वायू प्रदूषण होत आहे. यामुळे आजूबाजूच्या नागरिकांना दुर्गंधी तसेच वायू प्रदूषणाच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. विविध ऋतुंमध्ये उन्हाळा, पावसाळ्यात वेगवेगळ्या प्रकारे या मत्स्यप्रक्रिया उद्योगांतर्फे प्रदूषण होते. त्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. पनवेल व आजूबाजूच्या परिसरात सध्या मोठ्या प्रमाणात विकासकामे चालू आहेत तसेच पंतप्रधान आवास योजनेंतर्गत मोठमोठ्या गृहसंकुलांची कामे चालू आहेत. या सर्वामुळे या परिसरातील लोकसंख्या खूप वाढणार आहे. त्या दृष्टीने या जल, वायू प्रदुषणाबाबत कायमस्वरूपी उपाययोजना होणे आवश्यक असून नागरिकांचे जगणे सुसह्य झाले पाहिजे. त्यासाठी रासायनिक व मत्स्यप्रक्रिया उद्योगांचे तळोजा एमआयडीसी येथून स्थलांतर करून त्या उद्योगांकरिता लोकवस्तीपासून दूर वेगळा झोन स्थापन करावा आणि तेथे या सर्व उद्योगांचे स्थलांतर करण्यात यावे आणि त्यासाठी याबाबत निर्णय करण्याच्या दृष्टीने बैठकीचे आयोजन करावे, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी ना. सामंत यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

# अलिबागमध्ये कार पार्किंगवरून कुटुंबावर हल्ला

## एकाचा मृत्यू, तीन जण जखमी; पाच आरोपींना अटक

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील आवास येथे गुरुवारी (दि. २२) रात्री कार पार्किंगच्या क्षुल्लक कारणावरून एका कुटुंबावर जीवघेणा हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात एक जणाचा मृत्यू झाला असून अन्य तिघे गंभीर जखमी झाले. या प्रकरणी पोलिसांनी पाच जणांना अटक केली आहे.

आवासमध्ये राहणारे विवेक राणे आणि देवेंद्र म्हात्रे यांच्या कुटुंबात वाद होता. गुरुवारी पाऊस पडत असल्याने विवेक राणे आणि त्यांचे कुटुंबीय आपली कार ही शेडमध्ये पार्किंग करण्यासाठी गेले होते. या वेळी देवेंद्र म्हात्रे आणि विवेक राणे यांच्या कुटुंबियांमध्ये भांडण झाले. म्हात्रे यांच्या कुटुंबातील इतर पाच जण जुन्या भांडणाचा राग धरून तलवारी, चाकू तिथे घेऊन आले आणि त्यांनी राणे कुटुंबावर सशस्त्र हल्ला चढवला. यात धर्मेंद्र नंदकुमार राणे यांचा मृत्यू झाला तसेच विवेक राणे, विश्वास राणे, करूणा राणे गंभीर जखमी झाले. तिघांनाही अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या प्रकरणी मांडवा सागरी पोलीस ठाण्यात आरोपी देवेंद्र लक्ष्मण म्हात्रे, अंकित अशोक राणे, शुभम संतोष पाटील, वैभव लक्ष्मण म्हात्रे, पूनम देवेंद्र म्हात्रे आणि सिया देवेंद्र म्हात्रे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी सहापैकी पाच आरोपींना अटक केली असून अधिक तपास सुरू आहे. दरम्यान, आवास गावात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# हगवणे पिता-पुत्राला २८ मेपर्यंत पोलीस कोठडी

**पुणे : प्रतिनिधी**

वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणातील मुख्य आरोपींपैकी असलेल्या फरार सासऱ्याला राजेंद्र हगवणे आणि दीर सुशील हगवणे यांना पिंपरी चिंचवड पोलिसांनी अटक केली आहे. या दोघांना शुक्रवारी (दि. २३) पहाटे साडेचारच्या सुमारास सापळा रचून जेरबंद करण्यात आले. त्यांना शिवाजीनगर न्यायालयात हजर करण्यात आले असता २८मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

या प्रकरणात वैष्णवीच्या सासू, पती आणि नणंद यांना यापूर्वीच अटक करण्यात आली होती. राजेंद्र आणि सुशील हगवणे हे दोघेही गेल्या काही दिवसांपासून फरार होते. सध्या या प्रकरणात चौकशी अधिक वेगाने सुरू झाली असून सर्व आरोपींविरुद्ध ठोस पुरावे गोळा करण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे.

# भुजबळांकडे अन्न व नागरी पुरवठा; तर सावेंकडे दिव्यांग कल्याण विभाग

**मुंबई** : राज्य मंत्रिमंडळातील ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे अन्न व नागरी पुरवठा विभाग, तर मंत्री अतुल सावे यांच्याकडे दिव्यांग कल्याण विभागाचा कार्यभार देण्यात आला आहे. याबाबतची अधिसूचना सामान्य प्रशासन विभागाने प्रसिद्ध केली आहे.

## निवडक

### महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवर चार नक्षली चकमकीत ठार

**गडचिरोली** : गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुका आणि छत्तीसगड राज्याच्या सीमावर्ती भागातील जंगलात पोलिसांशी झालेल्या चकमकीत चार जहाल नक्षलवादी ठार झाले. यात दोन पुरुष आणि दोन महिलांचा समावेश आहे. हे नक्षलवादी उपकमांडर दर्जाचे आहेत. घटनास्थळावरून एक स्वयंचलित रायफल, एक ३०३ रायफल, एक भरमार बंदूक, वॉकीटॉकी व अन्य साहित्य हाती लागले आहे.

### मतदारांसाठी मतदान केंद्राबाहेर मोबाईल ठेवण्याची सुविधा

**मुंबई** : मतदारांच्या सोयीसाठी आणि मतदान दिवशीच्या व्यवस्थापनात सुधारणा करण्याच्या उद्देशाने भारत निवडणूक आयोगाने मतदान केंद्राच्या बाहेर मोबाईल ठेवण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे तसेच प्रचारासाठीची मर्यादादेखील नव्याने निश्चित करण्यात आली असल्याचे जाहीर केले आहे. मतदान केंद्राच्या १०० मीटरच्या आत केवळ बंद अवस्थेतील मोबाईल्स नेण्यास परवानगी राहील. प्रवेशद्वाराजवळ मोबाईल ठेवण्याची सुविधा दिली जाणार असून मतदारांना मतदान केंद्रात मोबाईल नेण्यास परवानगी नाही.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींचे देशाला खंबीर नेतृत्व -आमदार प्रशांत ठाकूर

## बूथ अध्यक्षांचा सन्मान, नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपल्या देशाच्या अस्मितेवर प्रहार करण्याचा कोणी प्रयत्न करीत असेल, तर त्यांना क्षमा करायची नाही अशी भूमिका घेणारे खंबीर नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या रूपाने आपल्याला मिळाले आहे याचा अभिमान आहे, असे उद्गार आमदार प्रशांत ठाकूर यांनी कार्यकर्ता व पदाधिकारी मेळाव्यात काढले. त्याचप्रमाणे ज्यांनी ज्यांनी भाजपचा झेंडा दिमाखात फडकत राहावा यासाठी प्रयत्न केले अशा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे त्यांनी अभिनंदन केले.



पनवेल शहर मंडळातील भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांचा मेळावा श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात गुरुवारी (दि. २२) झाला. या मेळाव्यास आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. विधानसभा निवडणुकीत प्रभावीपणे काम करणाऱ्या बूथ अध्यक्षांचा या वेळी सन्मान करण्यात आला तसेच पनवेल शहर मंडळातील नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे देण्यात आली.

या मेळाव्याला भाजप जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, माजी नगरसेवक अनिल भगत, गणेश कडू, राजू सोनी, माजी नगरसेविका प्रीती जॉर्ज-म्हात्रे, सारिका भगत, डॉ. सुरेखा मोहकर, हेमलता म्हात्रे, विनायक मुंबईकर, भाजप पनवेल मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्ष रूचिता लोंढे, युवा मोर्चाचे रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, शहर सरचिटणीस अमित ओझे, रूपेश नागवेकर, केदार भगत, अभिषेक पटवर्धन आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# किल्ले रायगडावरील पायरी मार्ग २८, २९ मे रोजी राहणार बंद

**महाड : प्रतिनिधी**

किल्ले रायगडावर जूनच्या पहिल्या आठवड्यात होणाऱ्या शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर किल्ले रायगडाच्या उंच कड्यावरील मोकळे झालेले दगड काढण्याची मोहीम येत्या २८ व २९ मे रोजी हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे हे दोन दिवस पायरी मार्ग बंद राहील, असे आदेश रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत.

यंदाचा शिवराज्याभिषेक सोहळा तारखेनुसार ६ जून व तिथीनुसार ९ जून रोजी साजरा करण्यात येणार आहे. या सोहळ्यासाठी राज्यातील हजारो शिवभक्त व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.



सन २०२३मध्ये शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी आलेल्या एका शिवभक्ताचा महादरवाजाच्या खालील बाजूस असलेल्या उंच कड्यावरून दगड अंगावरून पडून मृत्यू झाला होता. ही गंभीर बाब लक्षात घेऊन चालू वर्षी राज्याभिषेक सोहळ्याच्या अगोदर उंच कड्यावरील मोकळे दगड दुर्गवीर प्रतिष्ठान मुंबई बाजूला करणार आहेत. त्यासाठी येत्या २८ व २९ मे रोजी मोहीम राबविण्यात येणार असल्याने या दोन दिवशी पायरी मार्गाने गड चढून जाण्यासाठी मनाई करण्यात आल्याचे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या कालावधीत रोप वेची सुविधा सुरू राहणार आहे.

# माथेरान मिनिट्रेनला पर्यटकांची गर्दी

## फेऱ्यांमध्ये वाढ करण्याची मागणी

**माथेरान : प्रतिनिधी**

प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानमध्ये सध्या आल्हाददायक वातावरणामुळे पर्यटकांनी एकच गर्दी केली आहे. येथील अबालवृद्धांचे आकर्षण असलेल्या मिनीट्रेनमधून प्रवास करण्यासाठी मोठ्या प्रमाणात पसंती दिली जात असून अपुऱ्या फेऱ्या व बोगींची मर्यादित संख्या यामुळे अनेक पर्यटकांना मिनिट्रेन सफरीला मुकावे लागत आहे.



माथेरानच्या पर्यटनामध्ये मिनिट्रेन हा महत्त्वाचा घटक आहे. १९०७ साली सर आदमजी पिरभॉय यांनी स्वखर्चाने ही सेवा सुरू केली होती, जी आजही चालू आहे. देश-विदेशातून अनेक पर्यटक माथेरानला भेट देत असतात. ते मिनिट्रेनमधून प्रवास करण्यास उत्सुक असतात. अनेक छोटी मोठी नागमोडी वळणे पार करून २१ किमीचा प्रवास करीत ही गाडी माथेरान स्थानकात पोहचते.

सध्या नेरळ ते माथेरान या मार्गावर नेरळहून दोन, तर माथेरानवरून दोन अशा चार फेऱ्या दैनंदिन सुरू आहेत, तर माथेरान ते अमन लॉज स्थानकांदरम्यान शटल सेवेच्या नियमित १६ फेऱ्या सुरू असतात. या फेऱ्यांना पर्यटकांचा इतका प्रतिसाद आहे की अनेकांना विनातिकीट परतावे लागत आहे.

माथेरानच्या राणीला अर्थात या मिनिट्रेनला पर्यटकांकडून उदंड प्रेम मिळत असते, परंतु या मिनिट्रेन सेवेच्या मर्यादित फेऱ्या पाहता पर्यटकांना या सफरीपासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे निदान मुख्य पर्यटन हंगामावेळी म्हणजेच दिवाळी, नाताळ आणि एप्रिल-मे महिन्यात या फेऱ्यांमध्ये वाढ व्हावी, अशी मागणी केली जात आहे.

> **आम्ही दरवर्षी माथेरानला येतो. मुलांना येथील छोट्या झुकझुक गाडीची अर्थात मिनिट्रेनची आवड आहे, पण गर्दीच्या वेळी भरपूर वेळ रांगेत उभे राहूनदेखील तिकीट मिळत नाही. पर्यटन हंगामावेळी तरी मिनिट्रेनच्या बोगी आणि फेऱ्या वाढविल्या पाहिजेत, जेणेकरून बालगोपाळांसह ज्येष्ठ नागरिकांना सोयीचे होईल.**
> **-रेश्मा यादव, पर्यटक, ठाणे**

# मनसे विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष अनिमेष ओझे भाजपमध्ये

## सहकारी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनीही हाती घेतले 'कमळ'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरातील मनसे विद्यार्थी सेनेच्या कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. या सर्वांचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी पक्षात स्वागत केले.

पनवेल मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात गुरुवारी (दि. २२) भाजप पदाधिकारी व कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास माजी नगरसेवक गणेश कडू, माजी नगरसेविका प्रीती जॉर्ज-म्हात्रे, डॉ. सुरेखा मोहोकर, सारिका भगत, भाजप पनवेल मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, सरचिटणीस अमित ओझे, केदार भगत, रूपेश नागवेकर, महिला मोर्चा अध्यक्ष रूचिता लोंढे-समेळ, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर आदी उपस्थित होते.

या वेळी मनसे विद्यार्थी सेनेचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अनिमेष अमित ओझे, पनवेल शहराध्यक्ष केदार रेवाळे, प्रभाग १७ अध्यक्ष ऋषिकेश सावंत, तालुका सचिव आकाश गाडे, प्रभाग १९ अध्यक्ष अभि रिंगे, आकाश दलाल, हिमांशु पाटील, पराग भातणकर, प्रणय मोहिते, तन्मय मोरे, सौरभ रामधरणे, रूद्र पाटील, प्रभंजन गाडगीळ, प्रथम दासरी, प्रथम ठाकरे, प्रसाद धवळे, मृण्मय पाटील, शिवराज बोबडे, हर्षद घाटे, आशुतोष पाटील, रोहित धामणस्कर, हर्ष जेटवा यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. या सर्वांचे मान्यवरांनी पक्षात स्वागत करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# लोकसंख्येच्या प्रमाणात पोलीस भरतीला प्राधान्य -मुख्यमंत्री फडणवीस

**सांगली : प्रतिनिधी**

राज्यात आदर्श पोलीस प्रशासन निर्माण करण्यासाठी लोकसंख्येच्या अनुरुप पोलीसांची संख्या ठेवली जाणार आहे. त्यामुळे गृह विभागामार्फत नव्याने ४० हजार पोलीसांची भरती केली आहे. यापुढेही राज्यात पोलीस भरतीला प्राधान्य देणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



सांगली जिल्हा पोलीस दलाच्या वतीने बांधण्यात आलेल्या तीन इमारतींचे उद्घाटन व निवासस्थान इमारतीच्या भूमिपूजन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.यावेळी राज्याचे उच्च शिक्षण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, खासदार धनंजय महाडिक, खासदार विशाल पाटील, आमदार सर्वश्री अरुण लाड, जयंत पाटील, डॉ. सुरेश खाडे, सुधीर गाडगीळ, डॉ. विश्वजीत कदम, गोपीचंद पडळकर, सत्यजीत देशमुख, सुहास बाबर, अमल महाडिक,मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, जिल्हाधिकारी अशोक काकडे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, महानगरपालिका आयुक्त सत्यम गांधी, पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक अर्चना त्यागी, विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) मनोजकुमार शर्मा, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक (प्र) डॉ. शशिकांत माहवरकर, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, अपर पोलीस अधीक्षक रितू खोखर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पोलीस गृहनिर्माण महामंडळातर्फे राज्यातील पोलीस कार्यालय व पोलीसांच्या निवासस्थानासाठी निधी उपलब्ध करुन दिला आहे.सध्या ९४ हजार निवासस्थाने उपलब्ध झाली आहेत. प्रत्येक जिल्ह्यात फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध करुन देण्यात येत असून सायबर गुन्ह्यांच्या उकलीमध्ये देशात महाराष्ट्र पोलीस अव्वल असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. अंमली पदार्थाच्या तस्करीत, व्यवसायात, पोलीसांचा सहभाग आढळल्यास संबंधीत पोलीसाला निलंबित न करता थेट बडतर्फ करण्याचा इशारा देत अंमली पदार्थांच्या बाबतीत झिरो टॉलरन्स असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यात गुन्हेगार मोकाट सुटणार नाही हा विश्वास राज्यातील सामान्य माणसाला वाटेल अशा रितीने पोलीस विभाग कार्यरत राहील मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. पोलीस गृहनिर्माण महामंडळाने राज्यातील निवासस्थाने अतिशय गुणवत्तापूर्वक उभी केली असल्याबद्दल त्यांनी पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक अर्चना त्यागी यांचे विशेष अभिनंदन केले.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, जिल्ह्याचे पोलीस दल अधिक सक्षम करण्यासाठी शासन कटीबध्द असून त्याला योग्य तो निधी दिला जाईल, तसेच जिल्ह्यात ड्रग्ज विरोधी मोहिम प्रभावीपणाने राबविली जाईल. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.

या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हा वार्षिक योजनेतून प्राप्त सुमारे २ कोटी १३ लाख इतक्या रुपयांच्या १६ वाहनांचे लोकार्पण त्याचबरोबर सायबर विभाग अधिक गतिशील व्हावा या उद्देशाने जिल्हा वार्षिक योजनेतून प्राप्त झालेले सुमारे १५० संगणक, १५० स्कॅनर तर ४० मल्टी फंक्शन प्रिंटरचे सायबर विभागाला हस्तांतरण केले. तत्पूर्वी श्री. फडणवीस यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयाची नवीन प्रशासकीय इमारत त्याचबरोबर कडेगाव व आटपाडी पोलीस ठाण्याच्या इमारतींचे उद्घाटन तर सांगली येथे पोलीसांसाठी उभारण्यात येणाऱ्या २२४ सदनिकांचे रिमोटद्वारे भूमिपूजन केले.

## 'पोषण आहार व आरोग्यसेवा अंगणवाड्यांच्या माध्यमातून देणार'

**मुंबई : प्रतिनिधी**



प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान अंतर्गत अतिदुर्गम भागात नव्याने ३८ अंगणवाड्या सुरू करण्यात मान्यता देण्यात आली आहे. यापूर्वी मान्यता दिलेल्या १४५ अंगणवाड्या बांधून पुर्ण झाल्या असून, या अंगणवाड्यांच्या माध्यमातून अतिदुर्गम भागातील बालके आणि गरोदर स्त्रियांना पोषण आहार व आरोग्य सेवा पुरविण्यास मदत होणार असल्याची माहिती महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

या अभियानाचया माध्यमातून आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना राबविल्या जात आहेत. अतिदुर्गत भागात अंगणवाडी सुरू करण्यासाठी लोकसंख्येचे निकष शिथिल करण्यात आले असून, १०० लोकसंख्या असलेल्या भागात अंगणवाडी सुरू करण्यात येणार आहे. यामुळे अंगणवाड्यांच्या माध्यमातून आदिवासी बांधवांपर्यंत पोषण आहार आणि प्राथमिक आरोग्य सेवा पुरविण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान अंतर्गत राज्यातील दुर्बल आदिवासी गटात नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या ३८ अंगणवाडी केंद्रात एक अंगणवाडी सेविका, एक मदतनीस उपलब्ध करून देण्यात येणार आहे. राज्य व केंद्र शासनाच्या हिश्यातून मानधन, प्रशासकीय खर्च, पोषण आहार, अंगणवाडी भाडे, गणवेश प्रदान करण्यात येणार आहे. यापूर्वी बांधलेल्या १४५ आणि नव्याने बांधण्यात येणाऱ्या ३८ अशा एकूण १८३ अंणवाड्या गडचिरोली, नांदेड, नाशिक, पालघर, पुणे, रायगड, रत्नागिरी, सातारा, ठाणे, यवतमाळ या जिल्ह्यात सुरू करण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

## 'अवकाळी'मुळे अलिबागचा पर्यटन व्यवसाय अडचणीत

**अलिबाग : प्रतिनिधी**

गेले काही दिवस पडत असलेल्या पावसाचा फटका रायगड जिल्ह्यातील आंबा विक्री, मासेमारी, पर्यटन व्यवसायाला बसला आहे..पावसामुळे पर्यटन व्यवसायाचे आर्थिक गणित बिघडवून टाकले आहे.


वार्षिक परीक्षा संपल्यानंतर एप्रिल महिन्यापासूनच रायगडसह कोकणातील किनारे पर्यटकांनी फुलू लागतात. मे महिन्यातच नव्हे तर जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत इथला पर्यटन व्यवसाय सुरू असतो. परंतु यंदा मेच्या दुसरया आठवड्यापासून हजेरी लावलेल्या अवकाळी पावसाने पर्यटकांचा हिरमोड झाला आहे. पर्यटन व्यवसायाचे नुकसान झाले आहे. अनेक पर्यटकांनी आगाऊ बुकींग केले होते. परंतु ते रदद करणयात आले. केवळ मोठे व्यावसायिकच नाही तर किनारयांवर छोटेमोठे व्यवसाय करणारेही अडचणीत आले. हंगाम संपण्यापूर्वीच आपला व्यवसाय गुंडाळण्याची वेळ त्यांच्यावर आली.

साधारण दिवाळीपासून रायगडचा पर्यटन हंगाम सुरू होत असतो. मुंबईच्या जवळ असलेल्या अलिबागमध्ये दर शनिवार रविवारी पर्यटकांची मोठी गर्दी होत असते. दिवाळी, नाताळ किंवा मे महिना अशा मोठया सुटयांमध्ये रोजच पर्यटकांची वर्दळ असते. अलिबागबरोबरच नागाव, श्रीवर्धन, दिवेआगर, हरिहरेश्वर, मुरूड, काशिद, किहीमचे किनारे पर्यटकांचे फेवरीट डेस्टीनेशन ठरले आहे. पर्यटकांच्या वर्दळीतून स्थानिकांना मोठा रोजगार मिळतो. हॉटेल्स , लॉजींग खानावळी यांचा व्यवसाय जोरदार चालतो. शिवाय जेसकी, एटीव्ही राईडस, बनाना राईडस पॅराग्लायडिंग यासारखे वॉटर स्पोर्टस यांचा व्यवसाय करणारे इथं मोठ्या संख्येने उदरनिर्वाह करीत असतात. मात्र अवकाळी पावसामुळे या व्यवसायावर अवकळा आली आहे

## चार दिवसानंतर आत्रंट नीड गावातील विजेचे दिवे पेटले

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील आत्रंट नीड गावाला वीज पुरवठा करणाऱ्या वीज रोहित्रात बिघाड झाला होता. चार दिवसांनी या गावात वीज पूर्ववत असून महावितरण कार्यालयात या गावातील ग्रामस्थ पोहचल्यानंतर महावितरण कार्यालयाला जाग आली. दरम्यान ग्रामस्थांनी घेतलेल्या मेहनतीमुळे आत्रंट नीड गावातील वीज पुरवठा पूर्ववत झाला आहे.



नेरळ-कशेळे राज्यमार्ग रस्त्यावर आत्रंट नीड या १४० घरांची वस्ती असलेल्या गावातील १०० केव्हीए क्षमतेचा वीज रोहित्र १९ मे रोजी जळाले. तांत्रिक बिघाडामुळे या वीज रोहित्र मध्ये बिघाड झाल्याने या गावातील वीज पुरवठा खंडित झाला.त्यानंतर ग्रामस्थांनी स्थानिक लोक प्रतिनिधी आणि महावितरण कडे पाठपुरावा सुरू केला. तीन रात्र अंधार असल्याने आत्रंट नीड गावातील ग्रामस्थ संतप्त झाले. इलेक्ट्रिक उपकारणांना वीज पुरवठा खंडित झाल्याने अनेक अडथळे येत होते. त्यामुळे स्थानिक ग्रामस्थांच्या भावना संतप्त होत्या. त्यात सलग तीन दिवस या गावातील ग्रामस्थ महावितरण कार्यालयात जावून नवीन वीज रोहित्र बसविण्याची मागणी करीत होती.मात्र तरी देखील महावितरण कार्यालय लक्ष देत नसल्याने ग्रामस्थ संतप्त झाले होते.

पनवेल येथून नवीन वीज रोहित्र आणण्यात आले वीज रोहित्र बसविण्याची कार्यवाही केली. महावितरण कंपनी कडे आमदार महेंद्र थोरवे यांनी वीज रोहित्र बसवून देण्याची सूचना केली होती.

## बंद पडणाऱ्या शाळा वाचवण्यासाठी शिक्षकांची प्रेमाची साद

**अलिबाग प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षांपासून जिल्हा परिषदेच्या मराठी शाळांची अवस्था पटसंख्येअभावी बिकट होताना दिसत आहे. यातूनच अलिकडे शाळा बंदही पडल्या आहेत. त्यामुळे शाळा वाचवण्यासाठी शिक्षकांची धडपड सुरू झाली आहे. यातूनच जून महिन्यात नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आपल्या शाळांकडे वळवण्यासाठी काही शिक्षकांनी जाहिरातबाजी सुरू केली आहे. त्यात भरमसाठ डोनेशन देऊन वैतागलात ना, असा प्रश्न पालकांना विचारला जात आहे. आता मुलांना मराठी शाळांमध्येच प्रवेश घ्या, अशी प्रेमाची साद घातली जात आहे.

काही वर्षे मागे वळून पाहिले तर जिल्हा परिषदेच्या मराठी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना बसण्यास जागा अपुरी पडत होती. मात्र शिक्षकांवर टाकलेली अशैक्षणिक कामे, त्याचा काही शिक्षकांनी घेतलेला गैरफायदा, सातत्याने बदलत गेलेली शिक्षण पद्धत आणि महत्वाचे म्हणजे पालकांचे नोकरी व्यवसायासाठी स्थलांतर अशा बऱ्याच कारणांमुळे मराठी शाळांची पटसंख्या घसरू लागली. पालकांचा देखील खाजगी वि शेषतः इंग्रजी माध्यम शाळांकडे ओढा वाढला आहे. आज बहुतांशी शाळांमध्ये हाताच्या बोटावर मोजावीत इतकीच मुले शिल्लक राहिली आहेत. असे भयानक चित्र असतानाही शिक्षक पटसंख्या वाढावी म्हणून तितकेसे प्रयत्न करताना दिसत नव्हते.

आता आपली नोकरी टिकवण्याबरोबच गरीब पालकांना आधार देण्यासाठी शिक्षकांनी पटसंख्या वाढवून शाळा वाचवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. यातूनच आपल्या शाळांमध्ये विद्यार्थी यावेत, पालकांनी मराठी शाळेतच मुलांना प्रवेश घ्यावा, यासाठी जिल्हा परिषद शाळा व खासगी शाळा यांच्यातील फरक सांगणारी जाहिरातबाजी सुरू केली आहे.

या जाहिरातींचया माध्यमातून मराठी शाळेत सर्व विद्यार्थ्यांना दोन मोफत गणवेश, मोफत पाठ्यपुस्तके, मेरीटच्या आधारे निवड झालेले शिक्षक, सर्व शासकीय योजनांचा लाभ, मध्यान्ह भोजन योजना, प्रवेशासाठी कोणतीही शुल्क नाही, वर्षभर कसलेही शुल्क नाही, आनंददायी शिक्षण पद्धतीचा अवलंब या बाबी पालकांना समजावून सांगत आहेत.

याऊलट खासगी शाळेत मात्र महागडा गणवेश स्वतःच खरेदी करा, पाठयपुस्तके स्वतःच खरेदी करा, कमी अनुभवी शिक्षक, शासकीय योजनांच्या लाभाचा अभाव, मध्यान्ह भोजन आहार योजना नाही, प्रवेश फी सतत वाढणारी, सतत फीची मागणी, शिस्तीच्या नावाखाली केवळ दडपण असा फरक दाखवला जात आहे. आता विचार कसला करताय, आपल्या मुलाचा प्रवेश आजच निश्चित करा, अशी सादही घातली जात आहे.

**मागील आठवड्यात शिक्षण मंत्र्यांनी या संदर्भात सर्व शिक्षक संघटनांच्या प्रमुखांची बैठक घेतली. या वेळी विद्यार्थी संख्या वाढवण्यासाठी काय प्रयत्न सुरू आहेत याची माहिती घेतली तसेच काय केले पाहिजे याबाबत मार्गदर्शन केले. त्यानुसार शिक्षकांनी प्रयत्न सुरू केले आहेत.**

**-राजेश सुर्वे, राज्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक**

## खासदार श्रीरंग बारणे यांनी जाणून घेतल्या रेल्वे प्रवाशांच्या समस्या

**कर्जत : प्रतिनिधी**

मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग बारणे यांनी नेरळ आणि कर्जत रेल्वे स्थानकात भेट देऊन पहाणी केली आणि प्रवाशांच्या समस्या जाणून घेऊन मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांना सूचना केल्या. या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करू, असा शब्द दिला.



कर्जत आणि नेरळ येथील प्रवाशांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. या समस्या जाणून घेण्यासाठी खासदार श्रीरंग बारणे यांनी रेल्वे अधिकाऱ्यांसह शुक्रवार सकाळी साडे दहाच्या सुमारास नेरळ रेल्वे स्थानकाला भेट दिली आणि तेथील प्रवाशांच्या समस्या जाणून घेतल्या. नेरळ रेल्वे स्थानक एकदम चांगले होत आले आहे. असे सांगितले.

यानंतर त्यांनी नेरळहून लोकलने दुपारी बाराच्या सुमारास कर्जत रेल्वे स्थानकाला भेट दिली. शिवसेना जिल्हा प्रमुख संतोष भोईर यांनी खासदार बारणे यांचे स्वागत केले. याप्रसंगी माजी उपसभापती मनोहर थोरवे, तालुका प्रमुख सुदाम पवाळी, माजी नगरसेवक संकेत भासे, भाजपाचे उत्तर रायगड सरचिटणीस दीपक बेहेरे, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष अतुल बडगुजर, रमेश मते, दिलीप ताम्हाणे, अभिषेक सुर्वे, दिनेश कडू, प्रदीप वायकर, भरत बामणे, पप्पू ढाकवळ, विनोद दुलगज, दर्शन वायकर, किशोर कदम, दिनेश भरकले, पंकज ओसवाल आदी उपस्थित होते.

कर्जत रेल्वेस्थानक व्यवस्थापकाच्या दालनात बैठक घेतली. या बैठकीत दीपक बेहेरे, संकेत भासे यांनी प्रवाशांच्या अडचणी कथन केल्या. पंकज ओसवाल यांनी एसी लोकल, कर्जत रेल्वे स्थानकात नेहमी उद्घोषणाचा सावळा गोंधळ ,मध्यभागी पुलाची तर फलाट तीन वर शेड ची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आणले आऊटरला गाडी थांबवत असल्यामुळे प्रवासी हैराण होतात. कर्जतला लांब पल्यांच्या गाड्यांचे थांबे सुरू करावेत. पुण्याहून सकाळी सात-पन्नास ते दुपारी साडेतीन पर्यंत असे आठ तास एक ही गाडी नाही. कर्जत रेल्वे स्थानकावर एटीएम मशीन त्वरित लावावे. वांगणी, शेलू, भिवपुरी, खोपोली येथे पोलीस चौक्या निर्माण कराव्यात. भिसेगाव भागासाठी साठी भुयारी मार्ग करणे. कर्जत-खोपोली दरम्यान दोन दोन तास गाडी नाही त्यामध्ये गाडी एक लोकल गाडी सुरू करा आदी मागण्या केल्या.

नवीन कर्जत रेल्वेस्थानक एक चांगले मॉडेल स्थानक होईल. असे बारणे यांनी सांगून प्रवाशांच्या मागण्यांसाठी रेल्वे व्यवस्थापकांच्या बरोबर बैठक लावण्यात येईल, असे सांगितले.

## ऑपरेशन सिंदूरला श्रीवर्धनची सलामी; तिरंगा यात्रेत राष्ट्रप्रेमाची प्रचिती

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम परिसरात २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरात संतापाची लाट उसळली असून, त्या घटनेला भारतीय सैन्याने 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर अचूक व निर्णायक प्रत्युत्तर दिले. भारतीय जवानांच्या पराक्रमाला मानवंदना म्हणून श्रीवर्धन शहरात २३ मे रोजी भव्य तिरंगा यात्रा काढण्यात आली.



तिरंगा यात्रा श्रीवर्धन बसस्थानक येथून सुरू होऊन छत्रपती शिवाजी महाराज चौकात समारोप करण्यात आली. यात्रेत श्रीवर्धन तालुक्यातील हजारो नागरिक, युवक, विद्यार्थी, महिला आणि माजी सैनिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. राष्ट्रध्वज हातात घेऊन नागरिकांनी भारत माता की जय, वंदे मातरम्, जय जवान जय किसान, जय श्रीराम आणि छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

या यात्रेचे आयोजन श्रीवर्धन तालुका आणि शहरातील राष्ट्रप्रेमी संस्था, सामाजिक कार्यकर्ते आणि माजी सैनिक संघटनेकडून करण्यात आले होते. शेवटी छत्रपती शिवाजी महाराज चौकात झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात पहलगाम दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तसेच, तालुक्यातील माजी सैनिक संतोष दिवेकर, दिलीप पडवळ आणि दत्तात्रय मोरे यांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला. कोणताही अनुचित प्रकार न होता यात्रा अत्यंत शिस्तबद्धपणे पार पडली.

## मुरुडमधील शीतल दांडेकरच्या चित्र प्रदर्शनास कतार येथे उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुरुड : प्रतिनिधी**

कतारसारख्या ठिकाणी शीतल दांडेकरने चित्रप्रदर्शन घडवुन दाद मिळवली याचा सार्थ अभिमान आहे . मुरुडच्या या लेकीची ही कला अशीच बहरेल अशी अपेक्षा महेंद पाटील यांनी व्यक्त केली

शीतल दांडेकर ही विद्यार्थिनी मुरुडच्या सर एस ए हायस्कूल मध्ये शालांत परीक्षे नंतर रांगोळीकार कलाशिक्षक महेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जे .जे . स्कूल ऑफ आर्ट मधून पदवी प्राप्त केली . विवाहानंतर कत्तार येथील दोहा इथे वास्तव्यास आहे. पेंटींग, पोट्रेट तयार करण्याचा शालेय जीवनातील छंद जोपासत कलाविष्कार सादर करण्याची मोठी संधी तिला सौक वकिफ आर्ट सेंटर, दोहा मध्ये चित्रप्रदर्शन सादर करून मिळाली

लोककथा,ग्रामीणजीवन तसेच प्राणी,पक्षी आदी सजीव सृष्टी रेखाटण्याची कला जोपासून भौगिलिक परिस्थितीचे यथार्थ चित्रण करून कत्तार मध्ये या सवित्रीच्या लेकीचे तोंड भरून कौतुक केले गेले .शीतलच्या चित्र प्रदर्शनाचे अनावरण मुरुड येथील मार्गदर्शक कलाशिक्षक महेंद्र पाटील यांच्या हस्ते झाले



## कचऱ्यातील कपड्याचे व्यवस्थापन करणारा प्रकल्प पहिल्यांदा नवी मुंबईत

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र सरकारच्या वस्त्र मंत्रालय अंतर्गत टेक्सटाईल कमिटीच्या माध्यमातून नवी मुंबई महानगरपालिकेच्या सहयोगाने टाकाऊ वस्त्रावर प्रक्रिया करुन त्याचा पुनर्वापर करण्याचा नाविन्यपूर्ण प्रकल्प देशात पहिल्यांदाच नवी मुंबईत सीबीडी बेलापूर येथे राबविण्यात येत आहे. या प्रकल्पास महाराष्ट्र शासनाच्या वस्त्रोद्योग विभागाच्या प्रधान सचिव अंशू सिन्हा यांनी भेट देत प्रकल्पाच्या प्रक्रियेची बारकाईने पाहणी करत समाधान व्यक्त केले.



यावेळी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या भेटीदरम्यान हा अभिनव प्रकल्प सुरू करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने घेतलेल्या पुढाकाराबद्दल प्रधान सचिव श्रीम. अंशू सिन्हा यांनी प्रशंसा केली. या प्रकल्पाचे इतरही शहरांनी अनुकरण करावे, असे त्यांनी सांगितले.

या प्रकल्पाच्या माध्यमातून शाश्वत वस्त्र उपयोगासाठी चांगले काम केले जात असून याव्दारे महिलांनाही कुशल बनवून त्यांना रोजगार उपलब्ध होत असल्याबद्दल प्रधान सचिव श्रीम. अंशू सिन्हा यांनी हा प्रकल्प बहुउपयोगी असल्याचे मत व्यक्त केले. वस्त्र कच-याच्या मोठया समस्येवर या प्रकल्पाव्दारे अत्यंत प्रभावी उपाययोजना केली जात असून यामध्ये टाकून दिलेली वस्त्रे आकर्षक स्वरुपात पुनर्निमित करुन वापरात येत आहेत.

शाश्वततेसोबतच हा चक्रीकरणातून वस्त्र पुनर्वापराचा चांगला नमुना असल्याचे मत मांडत त्यांनी काम करणाऱ्या महिलांशी संवाद साधला

# खारघर से. १४ येथील अवैध बांधकामांवर तत्काळ कारवाई करा

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे पोलीस आयुक्तांना निवेदन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर सेक्टर १४ येथील कब्रस्तानासाठी दिलेल्या जागेचा वापर अवैधपणे मशिद व अन्य धार्मिक कार्यक्रमाकरिता होत असल्याबद्दल तसेच तेथे मोठ्या प्रमाणावर केलेल्या अनधिकृत बांधकामांवर तत्काळ कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी सीबीडी बेलापूर नवी मुंबई आयुक्तालय येथे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांना निवेदन दिले आहे.



आमदार प्रशांत ठाकूर यांनी निवेदनात म्हटले आहे की, माझ्या मतदारसंघातील खारघर सेक्टर १४ येथील जागा सिडकोने कवस्तानाकरिता राखीव ठेवली आहे, असे असतानासुद्धा सदर जागेचा वापर हा हेतुपुरस्सररित्या मशीद म्हणून केला जात असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नमाज पठण व इतर धार्मिक कार्यक्रमाचे नियमितपणे आयोजन होत असल्याचे निदर्शनात आले आहे. हे अत्यंत चुकीचे व संतापजनक आहे. या प्रकारांमुळे परिसरातील सामाजिक सलोखा धोक्यात आला असून आजुबाजुच्या परिसरातील नागरिकांमध्ये अस्वस्थता आहे.

या परिसरात मुस्लीम समाजाची लोकवस्ती नसतानादेखील मुद्दामून हेतुपूर्वक या सर्व गोष्टी केल्या जात आहेत. जाणीवपूर्वक मुस्लीम समाजातर्फे या कब्रस्तानच्या जागेचे कब्रस्तान मशीद असे संबोधन केले जाते व याठिकाणी नमाज पठणाकरीता तसेच धार्मिक कार्यक्रमाकरीता त्या समाजातील लोकांना बोलावले जात असल्याबाबत लक्षात आले आहे. या भूखंडावर कुठल्याही प्रकारची परवानगी न घेता मोठ्या प्रमाणात नमाजाकरीता सभागृह तसेच स्वच्छतागृह बांधण्यात आलेली असून त्याकरीता प्रचंड खर्च करून ग्रॅनाईट व मार्बलचा वापर केला आहे. एवढे सगळे अनधिकृत बांधकाम होत असताना सिडको पशारान व पोलीस प्रशासन यापैकी कुणालाही यावावत अजिबात काही माहिती मिळत नाही व त्यांच्याकडून कुठल्याही प्रकारची कारवाई केली जात नाही हे आश्चर्यकारक तसेच संतापजनक आहे.

मध्यंतरी याच खारघर परिसरात या समाजाच्या इज्तिमा कार्यक्रमानंतर एक हिंदू बांधवाला जीवे मारण्याचा अनुचित प्रकार घडल्याचे आपल्याला माहित असेलच. त्यानंतर या परिसरांत प्रचंड तणाव निर्माण झाला होता व सामाजिक परिस्थिती पूर्णपणे विस्कळीत होण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. या घटनेमुळे दोन्ही समाजांत प्रचंड तेढ निर्माण झाली होती व दंगलसदृष्य परिस्थिती झाली होती. त्यावेळी परिस्थिती आटोक्यात आणण्याकरिता पोलीस प्रशासन व लोकप्रतिनिधी यांना अथक परिश्रम घ्यावे लागले होते. अशातच आता सेक्टर १४ मधील कवस्तानच्या जागेचा अवैधरित्या मशिद व धार्मिक कार्याकरीता जो बिनदिक्कत वापर होत आहे. त्याबद्दल अन्य समाजात प्रचंड राग आहे व त्यासंदर्भात तेथील स्थानिक पदाधिकारी व नागरिकांनी वारंवार पाठपुरावा करूनसुद्धा प्रशासनामार्फत अद्यापही कोणतीच कारवाई केली जात नाही, हे खेदजनक आहे.

याबाबत प्रशासनातर्फे अजुनही दिरंगाई झाली तर त्या ठिकाणी दोन्ही समाजांमध्ये काहीतरी अनुचित प्रकार होऊन सार्वजनिक शांतता बिघडण्याची व कायदा व सुव्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

वारंवार तक्रारी करूनही कब्रस्तानासाठी दिलेल्या जागेवर खारघरचे रहिवासी नसलेल्या लोकांकडून नमाज पठण केले जाते व त्याच माध्यमातून एका समाजाला सातत्याने डिवचण्याचा प्रयत्न करणे हे प्रकार थांबविण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात पोलीस प्रशासनाकडून योग्य ती कारवाई करून कब्रस्तानाचे अवैधरित्या मशिदीत रूपांतर करणाऱ्या संबंधित ट्रस्टींवर व त्यांना पाठबळ देणाऱ्या व्यक्तींवर तातडीने कारवाई करावी.

पोलीस आयुक्तांना निवेदन देतेवेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासमवेत भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर शहर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, युवा मोर्चा खारघर अध्यक्ष मितेश पाटील, विश्व हिंदु परिषदेच्या प्रसन्ना धर्माधिकारी, क्रिश्ना बांदेकर, हिंदू जागरण मंचचे शिवम सिंग, अॅड. गायत्री खडवडकर, आदित्य कांबळे, शैलेंद्र त्रिपाठी आदी उपस्थित होते.

# पनवेल मनपा आयुक्तांकडून नालेसफाईची पाहणी

## कामे लवकर पूर्ण करण्याच्या सूचना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

यावर्षी भरपूर पाऊसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवरती मान्सुनपूर्व पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील चारही प्रभागातील विविध नाल्यांच्या सफाईची पाहणी करून नुकताच कामकाजाचा आढावा आयुक्त तथा प्रशसक मंगेश चितळे यांनी घेतला.



या वेळी स्वच्छता व घनकचरा विभागाचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते, शहर अभियंता संजय कटेकर, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, स्वच्छता विभाग प्रमुख अनिल कोकरे, प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी व कर्मचारी उपस्थित होते.

महापालिकेच्या ११० किलोमीटर क्षेत्रात १०१मोठे आणि २,१०४ छोटे नाले असून या महापालिका क्षेत्रात एकूण मोठे नाल्यांची संख्या ९७ इतकी आहे. यापैकी ६८ नाल्यांची सफाई पूर्ण झाली आहे. तर २,१०४ इतक्या छोट्या नाल्यांपैकी १ हजार २६२ नाल्यांची सफाई पूर्ण झालेली आहे. यावर्षी मान्सूनपूर्व पाऊसपण लवकर आल्याने नालेसफाईची सर्व कामे वेगाने पूर्ण होण्याच्या दृष्टीने आयुक्तांनी या नाले सफाई पहाणी केली. या पहाणी दरम्यान खारघर मधील सेक्टर १२, महापौर बंगलाजवळील नाले, उत्सव चौक, कळंबोली पंप हाऊस, कळंबोली चर्च जवळील नाला अशा सर्व नाल्यांची पाहणी आयुक्तांनी केली.

कळंबोली शहरात पालिकेचे विशेष लक्ष असून आपत्कालीन परिस्थितीसाठी यंत्रणा सज्ज ठेवण्याबाबत आयुक्तांनी सूचना दिल्या. या पाहणीवेळी आयुक्तांनी नाल्यातील काढलेला गाळाची योग्यरित्या विल्हेवाट लावणे गरजेचे असल्याचे सांगून, उर्वरीत नालेसफाईची कामे वेगाने करण्याच्या सुचना संबधित विभागास दिल्या.

### यांत्रिक पद्धतीने कार्यवाही

*आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी नालेसफाईचे सूक्ष्म नियोजन केले आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून यांत्रिक पध्दतीने चारही प्रभागातील नालेसफाईचे काम अंतिम टप्प्यात आले आले असून, नालेसफाईबरोबरच शहरातील छोट्या-मोठ्या गटारीच्या साफसफाईचे कामही जोमाने सुरू आहे. सध्या नालेसफाईची कामे युध्द पातळीवर सुरू असून या कामासाठी सरासरी ७०० मनुष्यबळ, १५ जेसीबी, १५ पोखलॅंड, १७ डम्पर वापरण्यात येत आहे. नालेसफाई कामामध्ये उचलण्यात आलेला गाळामध्ये मोठ्या प्रमाणात माती असल्याने पनवेल महानगरपालिका हद्दीतच मोकळ्या भूखंडावर पसरण्यात येत आहे.*

## निवडक

### कामोठे येथून महिला बेपत्ता



**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक महिला कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. रफिना मोहम्मदरजा अल्लाहखातून अन्सारी (२१ रा.जुई गाव) असे या महिलेचे नाव असून उंची पाच फुट, रंग सावळा, चेहरा उभट, नाक सरळ, डोळे काळे असून अंगात सफेद टॉप व ब्राऊन ओढणी तसेच पायात सफेद चप्पल व सोबत ग्रे बॅग आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने कामोठे पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार शेलार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### गोदामातून वायरच्या बंडलची चोरी

**पनवेल :** हजारो रुपये किंमतीच्या वायरच्या बंडलची चोरी पनवेल शहरातील गोडावूनमधून झाल्याची घटना घडली आहे. सुनील कांबरे यांचा मंडप डेकोरेटर्स व्यवसाय असून त्यांनी त्यांचे डोकेरेशनचे सामान टपाल नाका येथील गोडावूनमध्ये ठेवले होते. त्यामधील दोन वेगवेगळ्या प्रकारच्या वायरची बंडले ज्याची किंमत जवळपास ६० हजार रुपये इतकी आहे ही ताज सोडा फॅक्टरीच्या मागील बाजूस असलेल्या गोडावूनमधून अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### गाडीच्या बॅटरीसह रोकड पळवली

**पनवेल :** खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या वाहनाचे नुकसान करून त्यातील साडेदहा हजार रुपयांसह बॅटरी चोरण्यात आली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञातावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राकेश जाधव याचा नाश्ता, जेवणाचा व्यवसाय आहे. हा व्यवसाय ते चारचाकी वाहनातून करत असून, पनवेलमधील गुजराती शाळेजवळ त्याचे वाहन उभे असते. नेहमीप्रमाणे तो सकाळी गाडीजवळ आला असता गाडीचे दोन्ही दरवाजे उघडे दिसले. तसेच वाहनात असलेल्या गल्ल्यातील दहा हजार पाचशे रुपये व बॅटरी चोरीला गेल्याचे लक्षात आले. त्याशिवाय वाहनातील साहित्य बाहेर फेकण्यात आले होते. या प्रकरणाचा तपास पनवेल शहर पोलीस करत आहेत.

### पनवेलमधून एक जण बेपत्ता



**पनवेल :** रेल्वे स्थानक परिसरातून एक व्यक्ती बेपत्ता झाला असून त्याचा शोध पनवेल रेल्वे पोलीस करीत आहेत. बरलंगप्पा केदार वारी (२४ रा.आसाम) असे या व्यक्तीचे नाव असून उंची पाच फुट तीन इंच, अंगाने सडपातळ, रंग गोरा, नाक सरळ, डोळे काळे पांढरे असून, अंगात गुलाबी टी-शर्ट व काळी जिन्स पॅन्ट घातलेली आहे. तो पनवेल रेल्वे स्थानकातून फलाट क्र.६/७ येथून मिसींग झाला आहे. त्याच्या डाव्या डोळ्याच्या बाजूला नाकावर काळा तिळ आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यातील म.पोहवा. एस.एस.बोराटे (९८२१४२५४०४) किंवा पनवेल रेल्वे पोलीस (२७४५७१२२) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### रेल्वे प्रवासात लॅपटॉप चोरीला

**पनवेल :** रेल्वेने प्रवास करणाऱ्या महिलेची लॅपटॉप बॅग रेल्वेत विसरली असता अज्ञाताने ती चोरी केल्याची घटना घडली आहे. परिसरात राहणाऱ्या अंकिता सावरटकर यांच्यासोबत हा प्रकार घडला आहे. या प्रकरणी पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात अज्ञातावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रेल्वेमध्ये वारंवार होणाऱ्या चोरांना आळा घालण्याची मागणी प्रवाशांकडून करण्यात आली आहे.

# महापालिका मुख्यालयात दिव्यांग धोरण समन्वय बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिव्यांग कल्याण धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी व आदर्श दिव्यांग कल्याण धोरण तयार करण्याच्यादृष्टीने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या बैठक सभागृहात गुरुवारी (दि.२२) 'दिव्यांग धोरण समन्वय बैठक अतिरिक्त आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.



या बैठकीस उपायुक्त रविकिरण घोडके, उपायुक्त अभिषेक पराडकर, सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर , सचिव अक्षय कदम, कार्यकारी अभियंता सुधिर साळुंखे, उपअभियंता विलास चव्हाण, दिव्यांग विभाग प्रमुख प्रकाश गायकवाड विविध दिव्यांग संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी समिती गठित करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. या समितीमध्ये सामाजिक न्याय विभाग, आरोग्य विभाग आणि इतर संबंधित विभागांचे प्रतिनिधी तसेच दिव्यांग व्यक्तींचे प्रतिनिधीदेखील समाविष्ट करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानुषंगाने या दिव्यांग कल्याण समितीच्या माध्यमातून पनवेल महानगरपालिकेमध्ये दिव्यांग कल्याण विभागांतर्गत महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग व्यक्तींच्या समस्या आणि गरजांचा अभ्यास करणे, तसेच त्यांच्या विकासासाठी उपाययोजना करणे या उपायांमध्ये अपंग व्यक्तींना शिक्षण, रोजगार आणि सामाजिक सहभागाच्या संधी उपलब्ध करून देणे, तसेच त्यांना आवश्यक सुविधा आणि सहाय्य पुरवणे अशा गोष्टीचा पाठपुरावा केला जात आहे.

**महानगरपालिका हद्दीमध्ये डिजिटल माध्यमातून दिव्यांग व्यक्तींचा घरोघरी जाऊन सर्व्हे केला जात आहे. यामध्ये बहुतांश दिव्यांग व्यक्तींची घरे बंद असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या वतीने उपस्थित विविध संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना आवाहन करतो की, नागरिकांनी आपल्या संपर्कातील दिव्यांग व्यक्तींचा सर्व्हे झाला असल्याबाबत खात्री करावी व या सर्व्हेबाबत जनजागृती करावी, जेणेकरून कोणताही दिव्यांग व्यक्ती या सर्व्हेतून वगळला जाणार नाही आणि तो दिव्यांग कल्याणाच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची खबरदारी आपण घेऊयात.**

**-गणेश शेटे,**
**अतिरिक्त आयुक्त, पनवेल महानगरपालिका**

### काटेकोरपणे अंमलबजावणी

***उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार महापालिका कार्यक्षेत्रात दिव्यांग गाळे वाटप धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या दृष्टीने विविध महानगरपालिकांच्या दिव्यांग गाळे वाटप धोरणाचा अभ्यास करून सर्वसमावेशक असे आदर्श गाळे वाटप धोरणाचा कच्चा मसूदा उपायुक्त रविकिरण घोडके यांनी समितीपुढे वाचून दाखविला. या कच्च्या मसुद्यावर उपस्थित दिव्यांग संघटना पदाधिकारी यांनी त्यांच्या सूचना दिल्या.***

### संघटनांकडून महापालिकेचे आभार

***महापालिकेच्या वतीने तयार करण्यात येत असलेल्या आदर्श गाळे वाटप धोरण प्रक्रियेमध्ये दिव्यांग संघटनांना सामावून घेऊन, त्यांच्या सूचनांना प्राधानर दिल्याबद्दल व पनवेल महानगरपालिकेने अति तीव्र दिव्यांग (अंथरूनाला खिळून असलेल्या) व्यक्तींना उदर निर्वाह भत्ता लागू केल्याबद्दल उपस्थित दिव्यांग संघटनांच्या वतीने महापालिकेचे आभार या वेळी मानण्यात आले.***

# जासई हायस्कूलमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**उरण : प्रतिनिधी**

जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेजमधील इयत्ता बारावी व दहावीच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार स्थानिक स्कूल कमिटीच्या वतीने करण्यात आला.

शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष सुरेश पाटील, प्राचार्या के.जी. म्हात्रे, चेअरमन अरुण जगे, व्हाईस चेअरमन डी.आर.ठाकूर, नुरा शेख व इतर मान्यवरांच्या हस्ते पुढीलप्रमाणे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये इयत्ता दहावीमध्ये नावंदे कमलाकर राजेश्वर ९४.२० टक्के गुण मिळवून प्रथम तर घरत साहिल प्रशांत ९४ टक्के गुण मिळवून द्वितीय आणि घोरपडे अंकिता गणेश ९०.४० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. बारावी मध्ये कला शाखेत तनिषा विजय ठाकूर ६२ टक्के गुण मिळवून प्रथम तर संजना गौतम पडघणे ५९.६७ टक्के गुण मिळवून द्वितीय व वेदिका दिगंबर कोळी ५७.८३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे.

विज्ञान शाखेत दुबे आरती संजीत ८१.३३ टक्के गुण मिळवून प्रथम तर दुबे राधिका संजीत ७२ टक्के गुण मिळवून द्वितीय आणि म्हात्रे पृथ्वी रवींद्र ६८.८३ टक्के गुण मिळवून तृतीय आला आहे. या सत्कार सोहळ्यास गणेश पाटील, मधुकर म्हात्रे, महादेव म्हात्रे, यशवंत घरत, प्रकाश म्हात्रे, रवींद्र कासुकर इत्यादी मान्यवर, उपमुख्याध्यापक कुटे सर, पर्यवेक्षिका मुकादम मॅडम, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी पालक उपस्थित होते.



# पनवेलच्या पटेल मोहल्ल्यात काविळीच्या साथीची लागण

**पनवेल :** पटेल मोहल्ल्यात तब्बल १००पेक्षा जास्त काविळीचे रुग्ण आढळल्याने पनवेल महापालिका सतर्क झाली आहे. या भागातील पाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठविले आहेत. पनवेल शहरातील कच्छी मोहल्ला, पाडा मोहल्ला, पटेल मोहल्ला भागात कावीळ लक्षणे असलेले रुग्ण आढळल्याचे समोर आले आहे. या भागातील खासगी डॉक्टरांनी महापालिकेचे मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांना काही दिवसांपूर्वी ही माहिती दिली होती. पनवेल महानगरपालिकेने याची दखल घेतली आहे. पावसाळ्याच्या अनुषंगाने महापालिकेच्या पथकांनी घरी जाऊन सर्वेक्षण सुरू केले आहे.

# ऑपरेशन शोधमोहीम; ३३० बेपत्ता व्यक्तींचा शोध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई पोलिसांच्या वतीने राबविण्यात आलेल्या ऑपरेशन शोध मोहिमेत गत वर्षभरामध्ये शोध न लागलेल्या २१३ महिला, ९५ पुरुष, १० अपहृत मुले, १२ अपहृत मुली अशा एकूण ३३० बेपत्ता आणि हरविलेल्या व्यक्तींचा शोध घेण्यात नवी मुंबई पोलिसांना यश आले आहे. या मोहिमेत सापडलेल्या महिला, मुले-मुलींना त्यांच्या कुटुंबियांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. त्यामुळे सापडलेल्या या महिला आणि मुलांच्या कुटुंबियांनी पोलिसांचे आभार मानले आहेत.

हरविलेल्या महिलांचा आणि बालकांचा शोध घेण्यासाठी संपूर्ण राज्यभरामध्ये ऑपरेशन शोध अशी विशेष शोध मोहिम हाती घेण्यात आली होती. त्यानुसार नवी मुंबई पोलिसांनी १७ एप्रिल ते १५ मे या कालावधीत ऑपरेशन शोध मोहिम हाती घेतली होती. ऑपरेशन शोध या मोहिमेसाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील पोलीस ठाणे स्तरावर एकूण २० पथके तर गुन्हे शाखेतील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाकडील २ अशी एकूण २२ पथके तयार करण्यात आली होती. या मोहिमेत बेपत्ता होऊन वर्ष उलटून गेल्यानंतर देखील ज्या महिलांचा आणि मुला-मुलींचा शोध लागलेला नाही, अशा महिलांची आणि मुला-मुलींची माहिती नव्याने अद्ययावत आणि संकलित करण्यात आली. त्यानंतर त्यांचा नव्याने शोध घेण्यात आला.

त्यानुसार पोलिसांच्या २२ पथकाने गत महिन्याभरात मध्ये ऑपरेशन शोध मोहिमेअंतर्गत हरवलेल्या महिला आणि बालकांचा शोध घेण्यासाठी ठाणे, उल्हासनगर आणि कर्जत येथील बाल कल्याण समिती, ठाणे येथील बाल निरीक्षणगृहाचे अधीक्षक तसेच नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील विविध एनजीओ यांच्याशी समन्वय साधून बेपत्ता आणि हरविलेल्या महिला तसेच मुला-मुलींचा शोध घेतला. या शोध मोहिमेदरम्यान पोलिसांना २१ ३महिला, ९५ पुरुष, १० अपहृत मुले, १२ अपहृत मुली अशा एकूण ३३० बेपत्ता आणि हरविलेल्या व्यक्तींचा शोध घेण्यात यश आले. या सर्वांना त्यांच्या कुटुंबियांच्या ताब्यात देण्यात आले आहे. त्यामुळे त्यांच्या कुटुंबियांनी पोलिसांचे आभार मानले आहेत.

दरम्यान, नवी मुंबईतील हरवलेल्या महिला आणि मुला-मुलींसंदर्भात कोणतीही माहिती मिळाल्यास नागरिकांनी १०३ या हेल्पलाईनवर माहिती द्यावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## संपादकीय

# दहशतवादाचा निषेध हवाच

अमेरिकेतील वॉशिंग्टन डीसीमध्ये बुधवारी रात्री एका ज्यू संग्रहालयाच्या बाहेर इस्त्रायलच्या दूतावासातील दोन कर्मचाऱ्यांची गोळी झाडून हत्या करण्यात आली. संशयित हल्लेखोराने 'पॅलेस्टाइन मुक्त करा' अशा घोषणा दिल्या. ही हत्या ज्यूविरोधी भावनेतून करण्यात आल्याचे सांगत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या कट्टरतावादाचा तीव्र निषेध केला आहे. सगळीकडच्या दहशतवादाविरोधात अमेरिका व पाश्चात्यांनी अशीच सुस्पष्ट भूमिका घेण्याची गरज आहे.

**वॉशिंग्टन डीसीमध्ये झालेली हत्या खूप भयानक आणि ज्यूविरोधी भावनेने भरलेली आहे. हे आता संपायला हवे. द्वेष आणि कट्टरतावाद यांना अमेरिकेत काहीही जागा नाही, असे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्त्रायली राजदूतांवरील हल्ल्यासंदर्भात म्हटले आहे. आपण हे गाझासाठी केले असे हल्लेखोराने म्हटल्याचे समजते. गेले जवळपास १९ महिने हमास आणि इस्त्रायल यांच्या दरम्यानच्या संघर्षात गाझा पट्टीतील लोक भरडले गेले असून येथील जवळपास ५३ हजार लोक ठार झाले आहेत तसेच २१ लाख लोक आता दुष्काळसदृश परिस्थितीला तोंड देत आहेत. तेथील भीषण परिस्थितीची दखल आता पाश्चात्य जगाकडून घेतली जात असून अलीकडेच कॅनडा, फ्रान्स आणि ब्रिटनने इस्त्रायलवर निर्बंध लादण्याचा इशारा दिला आहे. अमेरिकेतही सध्या ज्यू समाजाच्या अनेक संस्थांना ज्यूविरोधी भावनेचा सामना करावा लागतो आहे. यापैकीच एक असणाऱ्या ज्यू संग्रहालयातील कार्यक्रमाला उपस्थित राहून हे दोन इस्त्रायली कर्मचारी निघाले असताना हा हल्ला झाला. हा एक सुनियोजित कट असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून स्थानिक वेळेनुसार रात्री नऊ वाजून पाच मिनिटांनी हा गोळीबार झाला. अनेक सरकारी इमारती असलेला हा भाग कडेकोट सुरक्षा व्यवस्था असणारा आहे. अटक करण्यात आलेल्या ३० वर्षीय संशयिताचे नाव एलियास रॉड्रिगेज असे असून तो शिकागोचा आहे. त्याने चार लोकांवर गोळ्या झाडल्या. त्यातल्या दोघांचा मृत्यू झाला. मारल्या गेलेल्या जोडप्याचे नाव यारोन लिश्चिन्स्की व सारा मिलग्रिम असे आहे. लिश्चिन्स्की हे संशोधक सहायक होते तर मिलग्रिम या इस्त्रायलच्या अधिकाऱ्यांच्या दौऱ्यांचे नियोजन करीत. अमेरिकेतील काही विद्यापीठांमध्ये गेल्या वर्षभरापासून गाझातील युद्धाच्या मुद्यावरून विद्यार्थ्यांची आंदोलने सुरू आहेत. इस्त्रायलशी संबंधित कंपन्या आणि व्यक्तींवर बहिष्कार घालण्याचे आवाहनही केले जाते आहे. इस्त्रायलच्या पॅलेस्टिनी भागातील कारवाया अलीकडे वाढल्या असून त्यामुळे इस्त्रायलला आंतरराष्ट्रीय विरोधाचाही सामना करावा लागतो आहे. आता जवळपास निम्म्या गाझा पट्टीवर इस्त्रायलचा ताबा आहे. इस्त्रायलने गाझा पट्टीकडे जाणारी मानवी दृष्टीकोनातून करण्यात येणारी मदतही थांबवली आहे. यात अन्न, इंधन आणि पाण्याचा समावेश आहे. त्यामुळे तिथे अन्नपदार्थांचा मोठा तुटवडा निर्माण झाला असून लूटमार होते आहे. अलीकडच्या काळात जगभरात गाझातील हलाखीच्या परिस्थितीविषयी काहीशी सहानुभूती निर्माण झाली होती. परंतु अमेरिकेतील या ताज्या हल्ल्यामुळे ज्यूविरोधी भावनेकडेही आता अनेक देशांकडून लक्ष दिले जाईल असे म्हटले जाते आहे. भारताने इस्त्रायली राजदूतांच्या या हत्येचा तीव्र निषेध नोंदवला असून पाश्चात्य देश व अमेरिकेनेही तेच केले आहे. अमेरिका इस्त्रायलच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे हे तर सर्वज्ञात आहे. परंतु भारतासारख्या देशातील दहशतवादाच्या संदर्भात व त्याला पाकिस्तानकडून खतपाणी घातले जाते याविरोधात मात्र पाश्चात्यांची व अमेरिकेची भूमिका हवी तितकी सुस्पष्ट नाही असेही यानिमित्ताने खेदाने म्हणावे लागते.**

# वीज आणि पशुधन : संरक्षणाचे प्रभावी उपाय



राज्यात सध्या अवकाळी पावसाचे आणि वादळी वाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे आणि यामुळे वीज पडण्याच्या घटनांमध्येही वाढ झाली आहे. मान्सूनपूर्व काळात, विशेषत: शेतीच्या कामांच्या वेळी, वीज पडण्याचा धोका अधिक असतो आणि यामुळे पशुधनाची हानी होण्याची शक्यता वाढते. भारतामध्ये महाराष्ट्रात वीज पडून मृत्यूमुखी पडणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. मराठवाडा आणि विदर्भासारख्या भागांमध्ये भौगोलिक रचना, कमी झाडी आणि हवामानातील बदलांमुळे हा धोका अधिक जाणवतो. वीज पडल्याने केवळ पशुधनच नव्हे, तर शेतकरी आणि मालमत्तेचेही मोठे नुकसान होते. जीवितहानी सुध्दा होते. त्यामुळे पशुपालकांनी आपल्या पशुधनाचे वीजेपासून संरक्षण करण्यासाठी योग्य उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. विजेपासून पशुधनाचे संरक्षण कसे करावे तसेच करावयाच्या उपाययोजनाबाबत माहिती देणारा लेख

**वीज पडण्याची कारणे :**

**वीज पडण्याची काही प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत :**

विद्युत भार (Electric Charge): ढगांमधील पाण्याच्या थेंबांचे आणि बर्फाच्या कणांचे घर्षण होऊन सकारात्मक आणि नकारात्मक विद्युत भार निर्माण होतो.

विद्युत क्षेत्र (Electric Field): ढग आणि जमीन यांच्यातील विद्युत भाराचे अंतर वाढल्याने एक शक्तिशाली विद्युत क्षेत्र तयार होते. जेव्हा हे क्षेत्र हवेच्या प्रतिकारापेक्षा अधिक होते, तेव्हा वीज जमिनीवर कोसळते.

तापमान आणि आर्द्रता (Temperature and Humidity): उष्ण आणि दमट हवामान ढगांची जलद निर्मिती करते, ज्यामुळे विद्युत भार लवकर वाढतो.

भौगोलिक घटक (Geographical Factors): उंच झाडे, पर्वत किंवा धातूच्या वस्तू वीज आकर्षित करू शकतात.

पशुधनाचे वीजेपासून संरक्षण करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना :

पशुपालकांनी आपल्या पशुधनाला वीजेच्या धोक्यापासून वाचवण्यासाठी खालील उपाययोजनांचा अवलंब करणे गरजेचे आहे :

**सुरक्षित आश्रय** (Safe Shelter): जनावरांना कधीही मोकळ्या जागेत बांधू नये. पावसाचे वातावरण आणि विजेचा गडगडाट होत असल्यास शेतातील काम त्वरित थांबवून जनावरांना गोठा, शेड किंवा मजबूत इमारतीमध्ये हलवावे.

गोठ्याचे छत आणि भिंती शक्यतो धातूच्या नसाव्यात, कारण धातू वीज आकर्षित करतात. जर धातूचे बांधकाम असेल, तर ते व्यवस्थितरित्या अर्थिंग केलेले असावे.

**अचानक आलेल्या वादळात स्वतःचा बचाव :**

जर तुमच्या अंगावरचे केस उभे राहत असतील किंवा त्वचेला मुंग्या येत असतील, तर तुमच्यावर वीज कोसळण्याची शक्यता आहे. अशा स्थितीत त्वरित जमिनीवर पाय गुडघ्यात दुमडून एकमेकांना जोडावेत, त्याभोवती हातांचा विळखा घालावा आणि हनुवटी गुडघ्यावर दाबून धरावी.

जनावरांना शक्य असल्यास खाली बसवावे.

वातावरण शांत झाल्यावर त्वरित सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा.

अचानक गडगडाट होत असल्यास आणि जवळपास फक्त झाडेच असतील, तर झाडाच्या उंचीच्या दुप्पट अंतरावर जमिनीवर वाकून बसावे.

जनावरे पाण्यात असल्यास त्यांना त्वरित बाहेर काढावे, कारण पाणी विजेचे सुवाहक असते.

**वीज सुवाहकांपासून सावधगिरी :**

गोठ्यातील लोखंडी पत्रे, वीजवाहक तारा किंवा विद्युत उपकरणांना स्पर्श करणे टाळावे.

गोठ्यातील वीज कनेक्शन आणि विद्युत अर्थिंग योग्य तसेच सुरक्षित असल्याची खात्री करावी. अर्थिंगमुळे वीज जमिनीत सुरक्षितपणे जाते आणि जनावरांना धोका टळतो.

विद्युत उपकरणांचा वापर टाळा :

आकाशात गडद काळे ढग जमून गडगडाट होत असल्यास गोठ्यातील कोणतेही विद्युत उपकरण चालू करू नये.

पशुधनाचे गोठे, कडबाकुट्टी यंत्र आणि गोठ्यातील इतर विजेचे साहित्य योग्यरीत्या अर्थिंग केलेले असावे.

धातूच्या वस्तूंपासून दूर राहा:

जनावरांजवळ धातूच्या वस्तू (उदा. लोखंडी साधने) ठेवू नयेत.

शेतात काम करणाऱ्या व्यक्तींनी धातूच्या वस्तू जसे की कुऱ्हाड, कोयते, छत्री त्वरित दूर टाकाव्यात.

धातूची पाणीपात्रे उंच ठिकाणी किंवा मैदानातील खुल्या जागी ठेवू नयेत, कारण त्या वीज आकर्षित करू शकतात.

**स्थानिक हवामानाकडे लक्ष देणे:**

हवामान खात्याच्या सूचनांचे नियमितपणे पालन करावे.

दामिनी ॲप (Damini -pp): भारतीय उष्णदेशीय मौसम विज्ञान संस्था पुणे (IITM²) आणि भारतीय हवामान विभागाने विकसित केलेले 'दामिनी वीज चेतावणी ॲप' डाउनलोड करावे. या पच्या माध्यमातून परिसरातील हवामानाचा आणि वीज पडण्याचा अंदाज मिळतो, ज्यामुळे वेळीच सुरक्षितता बाळगता येते.

वादळी वारे किंवा वीज पडण्याची शक्यता असल्यास जनावरांना गोठ्यातच ठेवावे.

जनावरांचे व्यवस्थापन:

गडगडाटाने जनावरे घाबरण्याची शक्यता असते, त्यामुळे त्यांना प्रेमळ वागणूक देऊन शांत करावे.

गोठ्यात योग्य तापमान आणि आर्द्रता राखण्यासाठी पंखे किंवा फॉगरचा वापर करावा.

जनावरांना पाणी आणि खनिज मिश्रणासह संतुलित आहार द्यावा, ज्यामुळे त्यांची रोगप्रतिकारशक्ती वाढते.

**तांत्रिक उपाय:**

गोठ्यांवर वीजरोधक यंत्रणा (लाइटनिंग अरेस्टर) बसवावी. ही यंत्रणा वीजेचा झटका जमिनीत सुरक्षितपणे पोहोचवते.

स्वयंचलित तापमान आणि आर्द्रता नियंत्रण प्रणालीचा वापर करावा.

इतर सुरक्षितता उपाय:

झाडाखाली आश्रय टाळा: उंच झाडे वीज आकर्षित करतात. त्यामुळे वीज पडण्याचा धोका असताना झाडाखाली स्वतः आणि जनावरांना बांधू नये. पावसामुळे मृत्यू होणार नाही, पण झाडाखाली थांबल्यास धोका निर्माण होऊ शकतो.

शेतामध्ये काम करत असताना आपण आणि जनावरे विद्युत तारांपासून किमान ५० फूट अंतरावर राहावे.

बैलांना नांगरत असताना तात्काळ लोखंडी जू पासून वेगळे करावे.

**आपत्कालीन उपचार:**

जर एखाद्या जनावरावर वीज पडली, तर त्वरित पशुवैद्यकीय मदत घ्यावी.

जागरूकता (A-wareness): पशुपालकांना वीज पडण्याचे धोके आणि त्यावरील बचाव उपायांबाबत माहिती द्यावी.

**नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीसाठी मदत:**

नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या व्यक्तींना केंद्र आणि राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून मदत दिली जाते.

वीज पडून जनावरांचा मृत्यू झाल्यास अल्प व अत्यल्पभूधारक आणि भूमिहीन पशुपालकांना शासनाच्या नियमांनुसार मदत मिळते. यासाठी मृत जनावराचा तलाठी यांचा पंचनामा, पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचे शवविच्छेदन अहवाल आणि इतर आवश्यक कागदपत्रे महसूल विभागाकडे जमा करावी लागतात.

या सर्व उपायांचे पालन करून पशुपालक त्यांच्या पशुधनाचे वीजेच्या धोक्यापासून संरक्षण करू शकतात. त्यामुळे, सतर्क राहा आणि आपल्या जनावरांची काळजी घ्या!

**संकलन : विजय राऊत,**
सहा. संचालक- अमरावती



## बदलते तंत्रज्ञान

# आयटेल आणि एआय असिस्टंटसह स्वस्त स्मार्टफोन

भारतातील स्मार्टफोन बाजारात आता एआय फीचर्ससह एक अत्यंत स्वस्त दरातील पर्याय दाखल झाला आहे. टेक ब्रँड itel ने आपला नवीन itel -९० स्मार्टफोन भारतात लाँच केला आहे. केवळ ६,४९९ रुपयांच्या सुरुवातीच्या किमतीत उपलब्ध असलेला हा फोन एन्ट्री-लेव्हल युजर्ससाठी डिझाइन करण्यात आला असून, यामध्ये इन-बिल्ट एआय असिस्टंट iV-Ana २.० देण्यात आला आहे. कंपनीचा दावा आहे की, हा एआय फीचर असलेला देशातील सर्वात स्वस्त स्मार्टफोन आहे.




या स्मार्टफोनमधील एआय असिस्टंट वापरकर्त्यांना दस्तऐवजांमधून उत्तर शोधणे, गॅलरीतील प्रतिमांचे स्मार्ट वर्णन करणे, तसेच व्हॉट्सअॅपवर व्हिडिओ व ऑडिओ कॉल्स करणे यासारखी कामे सहज पार पाडतो. हे फीचर्स सामान्य वापरकर्त्यांच्या दैनंदिन गरजांनुसार उपयुक्त ठरतात. त्यामुळे कमी बजेटमध्ये स्मार्ट तंत्रज्ञानाचा अनुभव घ्यायचा असेल तर itel -९० हा एक आकर्षक पर्याय आहे.

फीचर्स आणि स्पेसिफिकेशन्स-

itel -९० मध्ये ६.६-इंचाचा HD+ IPS डिस्प्ले आहे, जो ९०करिफ्रेश रेटसह येतो. यात 'ऑलवेज ऑन डिस्प्ले' आणि 'डायनॅमिक बार' सारखी वैशिष्ट्ये दिली गेली आहेत, ज्यामुळे वापरकर्त्याला स्क्रीन न उघडता महत्त्वाची माहिती मिळते. या फोनमध्ये ऑक्टा-कोर T7100 प्रोसेसर असून तो Android 14 Go Edition वर चालतो.

फोनमध्ये १३**एमपी** चा प्रायमरी रिअर कॅमेरा आणि ८**एमपी** फ्रंट कॅमेरा आहे. स्लाइडिंग झूम बटण व प्रगत इमेज प्रोसेसिंग तंत्रज्ञानामुळे फोटोग्राफीचा अनुभव अधिक चांगला होतो. यात ४**जीबी** रॅमसह ८**जीबी** पर्यंत व्हर्चुअल रॅम सपोर्ट आहे. स्टोरेजच्या दोन पर्यायांमध्ये ६४**जीबी** आणि १२८**जीबी** अंतर्गत स्टोरेज आहे.पॉवर बॅकअपसाठी, फोनमध्ये ५०००m-h क्षमतेची बॅटरी आहे, जी १०थ चार्जरसह येते आणि 15W चार्जिंग सपोर्ट करते. सुरक्षेसाठी फेस अनलॉक व साइड-माउंटेड फिंगरप्रिंट सेन्सर आहे. तसेच IP54 रेटिंगमुळे फोन धूळ व पाण्याच्या हलक्या शिंतोड्यांपासून सुरक्षित आहे. DTS साउंड टेक्नॉलॉजीमुळे ऑडिओ अनुभव अधिक तल्लीन करणारा आहे.

# पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ



## निमित्त

जागतिक कीर्तीचे मराठी पर्यावरण शास्त्रज्ञ म्हणजे डॉ. माधव धनंजय गाडगीळ. त्यांचा जन्म २४ मे १९४२ रोजी व शालेय शिक्षण पुण्यात झाले. त्यांचे वडील धनंजयराव बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीचे आजीव सदस्य होते. सलीम अलींसारखे ख्यातनाम पक्षीतज्ज्ञ त्यांचे मित्र होते. जे.बी.एस. हाल्डेन हे जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ गाडगीळांच्या वडिलांच्या परिचयाचे होते. त्यांचे घर पुण्यात जैवविविधता टिकवून ठेवलेल्या वेताळ टेकडीच्या परिसरात असल्याने भटकंती करणाऱ्या माधवरावांना जीवशास्त्र या विषयात रस निर्माण झाला. पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयातून प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र आणि रसायनशास्त्र हे विषय घेऊन त्यांनी पदवी मिळवली. नंतर त्यांनी इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, मुंबई येथून सागरी जीवविज्ञानातील पदव्युत्तर पदवी मिळवली.

माधव गाडगीळ हे पीएचडीच्या अभ्यासासाठी पुढे अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठात गेले. जीवशास्त्र विषयात गणितीय प्रतिमानांचा आधार असणारा प्रबंध सादर करणारे माधवराव हार्वर्डमधील पहिलेच विद्यार्थी होते. त्यांच्या या कामाचा संदर्भ पुढे अनेक संशोधक दीर्घकाळ देत राहिले. गाडगीळांना विल्यम बॉसर्ट यांच्या मार्गदर्शनाखाली माशांच्या वर्तनाबद्दल जीवविज्ञानातील पीएचडी मिळाली. त्यांच्या संशोधनासाठी हार्वर्ड कम्प्युटिंग सेंटरने आयबीएम शिष्यवृत्ती त्यांना दिली होती.

हार्वर्ड विद्यापीठात उपयोजित गणित संशोधन अभिछात्र पदावर त्यांनी कारकीर्दीची सुरुवात केली. नंतर त्यांनी हार्वर्ड विद्यापीठात जीवशास्त्र व्याख्याता, स्टॅन्फर्ड विद्यापीठात मानवी जीवशास्त्राचे अतिथी प्राध्यापक व्याख्याता, युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, बर्कलीत सन्माननीय भारतीय अमेरिकन व्याख्याता अशी पदे भूषविली.

पुढे माधव गाडगीळ भारतात परतले. त्यांनी पुण्यात दोन वर्षे महाराष्ट्र असोसिएशन फॉर कल्टिव्हेशन ऑफ सायन्समध्ये (आता आघारकर संशोधन संस्था) वैज्ञानिक अधिकारी म्हणून काम पाहिले.

१९७३ ते २००४दरम्यान इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगळुरू हे त्यांनी आपल्या कामाचे केंद्र ठेवले. तेथे आधी सहाय्यक, सहयोगी प्राध्यापक, नंतर प्राध्यापक आणि शेवटी त्यांनी तेथेच सेंटर फॉर इकॉलॉजिकल सायन्सेस ही संस्था स्थापन केली व तिचे ते अध्यक्ष होते. या संस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे देशभरातील संशोधक, शिक्षक, प्राध्यापक, धोरणकर्ते, शेतकरी, स्वयंसेवी संस्थेतील कार्यकर्ते आणि अधिकारी एकत्र येऊन काम करत. शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनाही संस्थेने जैवविविधता संरक्षण आणि संवर्धन उपक्रमांत जोडून घेतले. गाडगीळांच्या प्रभावामुळे संस्थेच्या पर्यावरण विषयक सर्व प्रकल्पांत प्राण्यांचे वर्तनदेखील सातत्याने अचूक आकडेवारीत नोंदण्याचे धोरण ठेवले गेले. विज्ञानात अशा संख्यात्मक नोंदींचे विश्लेषण करणे महत्त्वाचे ठरते. माणूस हादेखील जैवविविधतेतील एकात्म पर्यावरणीय घटक आहे. तो पर्यावरणातून वगळून चालणार नाही, अशी विचारसरणी गाडगीळांनी ठेवल्यामुळे जैवविविधता संरक्षण, संवर्धनात स्थानिक लोकांच्या विरोधाची धार बोथट झाली.

त्यांचे समाजोपयोगी संशोधन, मार्गदर्शन विज्ञानप्रसाराचे कार्य अथकपणे सुरू आहे.

(साभार : इंटरनेट)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# रिकाम्या पोटी चहा-बिस्किट खाल्ल्याने वाढते जळजळ

भारतात चहाप्रेमींची कमतरता नाही. बरेच लोक दिवसाची सुरुवात चहाने करतात. ताजेतवाने वाटण्यासाठी चहा पिणे आवश्यक मानतात. चहासोबत बिस्किटे, रस्क किंवा काही हलका नाश्ता खाणे हे नेहमीचेच आहे. पण ही रोजची सवय आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते.चहासोबत साखरेचे किंवा कार्बोहायड्रेटयुक्त स्नॅक्सचे मिश्रण केल्याने रक्तातील साखरेची पातळी झपाट्याने वाढू शकते. त्याचा पचनसंस्थेवरही वाईट परिणाम होतो. जर तुम्हाला आधीच मधुमेह किंवा रक्तातील साखरेच्या समस्येचा त्रास होत असेल तर ही सवय तुमच्यासाठी आणखी धोकादायक ठरू शकते.



अनेकांना सकाळच्या चहासोबत ब्रेड, बिस्किटे, रस्क, पापडी किंवा टी-केक असे हलके नाश्ते खायला आवडतात. या गोष्टी सामान्य आणि हलक्या वाटू शकतात, पण त्या आरोग्यासाठी हानिकारक असू शकतात. विशेषतः जेव्हा रिकाम्या पोटी किंवा चहासोबत घेतले जाते. असे केल्याने रक्तातील साखरेचे प्रमाण झपाट्याने वाढू शकते.यामुळे दिवसभर थकवा, अशक्तपणा किंवा साखरेच्या पातळीत असंतुलन येऊ शकते.

बिस्किटे, रस्क किंवा पापड यासारख्या पदार्थांमध्ये रिफाइंड कार्बोहायड्रेट्स आणि साखर असते, जी पचायला वेळ लागतो. जेव्हा हे रिकाम्या पोटी चहासोबत घेतले जातात, तेव्हा ते लवकर पचतात आणि रक्तात साखर सोडतात, ज्यामुळे पचनसंस्थेवर परिणाम होऊ शकतो. त्यामध्ये असलेले ट्रान्स फॅट आणि साखर पचनक्रिया मंदावते. यामुळे पोटात जडपणा, गॅस आणि ॲसिडिटीसारख्या समस्या उद्भवू शकतात. याशिवाय, साखर आणि रिफाइंड अन्नामुळे पचनसंस्थेत सूज आणि जळजळ होऊ शकते. जास्त काळ याचे सेवन केल्याने गॅस्ट्रिटिस किंवा अल्सर सारख्या आजारांचा धोका वाढू शकतो.

ज्येष्ठ आहारतज्ज्ञ डॉ. अमृता मिश्रा म्हणतात की सकाळी चहासोबत निरोगी पदार्थ खा, जे सहज पचतात आणि तुमची पचनसंस्था निरोगी ठेवतात. यामुळे तुमच्या दिवसाची सुरुवात चांगली होईल आणि तुम्ही निरोगीही राहाल. काही चांगले पर्याय म्हणजे शेंगदाणे, बदाम, ओट्स किंवा मूग डाळ किंवा भाजीपाला पराठे सारखे घरगुती चवदार स्नॅक्स असू शकतात. असे खाल्ल्याने तुम्हाला ऊर्जा मिळेल आणि तुमची रक्तातील साखर देखील नियंत्रणात राहील.

# उद्योजक बनण्यासाठी आत्मविश्वासाने प्रयत्न करा



## प्रशासन आपल्या पाठिशी खंबीर -जिल्हाधिकारी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षीत युवक-युवतींना व्यवसाय उभारणीसाठी प्राधान्याने कर्ज उपलब्ध करुन देण्यात येते. शासनाने या योजनेत अमूलाग्र बदल केला असून कोकणातील स्थानिक बाबींचा यामध्ये समावेश केला आह. तरी जास्तीत जास्त युवकांनी या योजनेचा लाभ घेऊन उद्योजक बनावे. यासाठी जिल्हा उद्योग केंद्र व बँक यांनी सर्वोतोपरी सहाय्य करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाच्या लाभार्थ्यांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक गुरुशांत हरळय्या, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक विजय कुलकर्णी, उद्योजक लक्ष्मण जाधव यांसह जिल्ह्यातील प्रमुख बँकर्स उपस्थित होते.

जिल्हाधिकारी जावळे यांनी जिल्ह्यात उद्योगधंदे उभारणी झाली तरच रोजगार निर्मिती होईल हे लक्षात घेऊन या कार्यक्रमांतर्गत सुशिक्षीत युवक-युवतींना कर्ज उपलब्ध करुन त्यांना व्यवसाय उभारणीसाठी प्राधान्याने कर्जाचा पुरवठा करण्याचे निर्देशित केले. तसेच सर्व बँकांच्या जिल्हा समन्वयकाने प्राधान्याने जास्तीत जास्त कर्ज पुरवठा करण्याकडे लक्ष द्यावे. नव उद्योजकांनी उद्योग उभारल्यास त्यांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध होऊन आर्थिक उन्नती साध्य करता येईल. या उद्योजकांमध्ये आर्थिक विकासाला चालना देण्याची क्षमता आहे, असेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम व पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमात रायगड जिल्ह्याने १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण केले ही अतिशय भूषणावह बाब आहे. यंदाच्या वर्षात जिल्हा प्रशासन २०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करेल असेही त्यांनी या वेळी सांगितले. लाभार्थ्यांने आपला उद्योग व्यवसाय सुरु करताना येणाऱ्या अडचणी, समस्या जिल्हा प्रशासनास अवगत केल्यास जरुर आम्ही आपल्याला मदत करणार असे आश्वासन जिल्हाधिकारी श्री. जावळे यांनी सर्व लाभार्थ्यांना दिले. तसेच सर्व नवउद्योजकांना आपल्या भावी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा व्यक्त करुन त्यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

जिल्हा महाव्यवस्थापक श्री. हरळय्या यांनी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेत आता दुहेरी फायदा आणि मोठ्या संधी मिळणार असल्याचे सांगितले. उत्पादन क्षेत्रातील प्रकल्पांसाठी रु.१ कोटी आणि सेवा व कृषी पूरक व्यवसायांसाठी रु.५० लाख पर्यंत कर्ज मिळवण्याची संधी आह. सेवा उद्योगांसाठी आता प्रकल्प खर्चाच्या ६०% आणि उत्पादन उद्योगांसाठी ४०% पर्यंत खेळत्या भांडवलासाठी निधी उपलब्ध होणार आह. ढरीशलह कुक्कुटपालन, अंडी उबवणी केंद्र, मधुमक्षिकापालन, मत्स्यपालन, रेशीम उद्योग, हॉटेल/ढाबा (शाकाहारी/मांसाहारी), होम-स्टे, क्लाऊड किचन, जलक्रीडा, मासेमारी, प्रवासी वाहतुकीकरिता बोट व्यवसाय आता योजनेतंर्गत पात्र असणार आहे. १० लाखांवरील उत्पादन प्रकल्पांसाठी आणि ५ लाखांवरील सेवा व कृषी पूरक व्यवसायांसाठी आता फक्त आठवी पास असणे आवश्यक असून१८ वर्ष पूर्ण झालेल्या कोणत्याही स्थानिक रहिवाशाला या योजनेचा लाभ घेता येईल. सर्वांनी जिल्हा उद्योग केंद्राशी संपर्क साधावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. जिल्हा महाव्यवस्थापक श्री. हरळय्या यांनी उपस्थित सर्वांचे आभार व्यक्त करुन भविष्यात अडचणी आल्यास जिल्हा उद्योग केंद्र येथे भेट द्यावी, असे सांगून मेळाव्याची सांगता करण्यात आली.

सीएमईजीपीच्या लाभार्थी नवउद्योजकांना रायगडचे उद्योजन लक्ष्मण जाधव यांनी मार्गदर्शन केले. उद्योग सुरु करताना निर्णय क्षमता, नवतंत्रज्ञान, उत्पादन गुणवत्ता व महत्वाचे बिझनेस इथिक पाळण्याचे अत्यंत आवश्यकता आहे. तसेच नवउद्योजक सतत नवनवीन गोष्टी शिकण्यासाठी विद्यार्थी म्हणून ज्ञान आत्मसात करुन आपल्या व्यवसायात कालानुरुप बदल करावे असे श्री. जाधव यांनी सांगितले.

# थोरले शाहू महाराज पालखी सोहळा गांगवली येथे उत्साहात

**माणगाव : बातमीदार**

आशिया खंडातील सर्वोत्तम प्रशासक स्वराज्याचे चौथे छत्रपती श्री शंभू पुत्र छत्रपती श्री थोरले शाहू महाराज जयंती पालखी सोहळा श्री क्षेत्र गांगवली ते राजधानी सातारा नुकताच गांगवली येथे संपन्न झाला.

या वेळी शिवनेरीला शिवजयंती आणि पुरंदरला शंभू जयंती तसेच रायगड किल्ल्यावर ज्या भव्यदिव्य स्वरूपात समारंभ साजरे होतात तसेच शंभुपुत्र चौथ्या छत्रपती शाहू राजे यांचे जन्मस्थळ स्मारक उदयास येईल आणि त्यासाठी प्रशासन आणि शिवभक्त यांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन सुशीलकुमार कदम यांनी सांगितले.

शिवाव्याख्याती सायली भोसले-पाटील हिने पहिला शाहू महाराज यांचा जन्मसोहळ्याचा पोवाडा स्वतः लिहून सादर केला. रायगड भूषण रोहित सचिन भोईर आणि स्वरा सचिन भोईर यांनी जन्मोत्सवाच्या पूर्वसंध्येला स्वरसंध्या हा शास्त्रीय संगीत कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमाला मुंबई, ठाणे, पुणे, भोर, सातारा, सांगली, मिरज, कर्जत आणि माणगांव रायगडचे तमाम शिवभक्त मान्यवर उपस्थित होते.

छत्रपती शाहू महाराज यांचे साडू वंशज रघुनाथ दौलतराव डुबल इनामदार, सदाशिवगड, सरसेनापती हंबीरराव मोहिते यांचे वंशज जयाजीराव बाजी मोहिते तळबीड, प्रतापराव गुजर यांचे वंशज सयाजीराव गुजर, प्रतापगडचे सरदार वीर कमलोजी साळुंखे यांचे वंशज सुहास शंकरराव साळुंखे, सरसेनापती संताजी घोरपडे यांचे वंशज श्रीमंत राणोजीराजे घोरपडे, पावनखिंड मध्ये शौर्य गाजवलेले ३०० बांदल यांचे वंशज संतोष बांदल, बेटर सोसायटी फाउंडेशनच्या अध्यक्ष मंजुषा ताई, आई कणकाई संस्थेचे अध्यक्ष रायगड भुषण सुशील कदम, मंत्री भरत गोगावले यांची कन्या शीतलताई गोगावले-कदम, शिवसेना महिला जिल्हाप्रमुख निलीमा घोसाळकर, विश्वस्त ज्ञानदेव दाखिणकर, उपसरपंच अनिल वनगुले, सदस्य रामचंद्र दाखिणकर, कृष्णा वाघमारे यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती.

आता चालू स्मारक कामासाठी ५० लक्ष निधी भरतशेठ यांनी दिला आहे. आणि आणखी वाढीव चार कोटी प्रस्तावित केलाय आणि वर्षभरात भव्य वास्तू उभी राहील हे शीतल ताई गोगावले यांनी या वेळी अश्वसित केलं आणि शुभेच्छा दिल्या. शाहू महाराज यांचे जीवनपट पुस्तकाचे प्रकाशन शितलताई गोगावले आणि मावळ्यांचे वंशज यांचे हस्ते संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे आयोजन छत्रपती थोरले शाहू महाराज स्मारक समिती गांगवली, ग्रुप ग्रामपंचायत गांगवली,समस्त गांगवलीकर ग्रामस्थ, छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान तोंडलेकरवाडी, बेटर सोसायटी फाउंडेशन, छत्रपती शाहू महाराज पालखी सोहळा सातारा ग्रुप यांनी केले होते.




# आगरदांडा पोर्टसाठी झालेल्या रस्त्यामुळे तळा तालुक्याच्या विकासाला चालना

**तळा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील दिघी बंदर हे एक जेएनपीटीचे पर्यायी प्रवेशद्वार म्हणून विकसित होत असून जागतिक पायाभूत सुविधांसह मल्टी-कार्गो हब म्हणूनही उदयास येणार आहे.हा विकास होत असताना दिघी पोर्ट साठी झालेला पुणे- आगरदांडा हा रस्ता तळ्याच्या विकासाला गती मिळणारा रस्ता झाल्याने यामुळे उद्योगधंदे वाढीसाठी एक चालना मिळणारे आहे.

हा रस्ता इंदापूर तळा मांदाड असा आगरदांडा पर्यंत गेला आहे.सध्या या रस्त्याला तालुक्यातील अनेक गावे जोडली गेली आहेत.या रस्त्यामुळे सध्या तालुक्यातील बोरघरहवेली हे मध्यवर्ती



ठिकाण होत असून याठिकाणाचा विकास झपाट्याने होण्यास सुरुवात झाली आहे. त्याच बरोबर तळा शहराचा विकास काही काळावधीत होण्यास सुरुवात होणार आहे. हा मार्ग पर्यटनाच्या दृष्टीने जवळचा व चांगला असल्याने रस्त्याने मुरूड, श्रीवर्धन कडे जाणारे पर्यटकही सध्या मोठ्या प्रमाणात या मार्गावरून जात असल्याने हॉटेल व्यवसायाला चालना मिळताना पहावयास मिळत आहे.दिघी पोर्टचे काम पूर्ण झाले की या रस्त्यावरून वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढेल व त्याच बरोबर ग्रामीण भागात छोटे मोठे धंदे वाढून व्यवसायाला चालना मिळून आर्थिक उत्पन्नात वाढ होईल.या व्यवसायां बरोबर ग्रामीण भागातील स्थानिक मालाला मागणी वाढून तो माल स्थानिक बाजारात विक्री होऊन त्याचा लाभ शेतकऱ्यांना होईल.

अनेक भागात वसाहती वाढण्यास सुरुवात होणार आहे.त्याच बरोबर नवनवीन हॉटेल वाढत आहेत त्यांनाही धंदा मिळत आहे.आता रस्त्यावर वाहनांची वर्दळ वाढत असल्याने धंदेतही वाढ होत आहे.

# मुरूड नगर परिषदेतर्फे घरपट्टीमध्ये १५ टक्के वाढ

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड नगरपरिषदेने घरपट्टी वाढीसाठी सर्वेक्षण सुरू केले असून संपूर्ण मुरुड शहरात सात टीम गठित करण्यात आली असून संपूर्ण शहरातील घरांचे मोजमाप पूर्ण करण्यात येणार असून १५ टक्के घरपट्टी वाढ करण्यात येणार असल्याची माहिती मुरुड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी दिली आहे.

या बाबत त्यांनी अधिक माहिती देताना सांगितले की,मागील चार वर्षापूर्वी सर्वेक्षण करण्यात आले होते परंतु निवडणूक कामामुळे हे काम तसेच स्थगित ठेवण्यात



आले होते.आता पुन्हा ही मोहीम हाती घेण्यात आली असून सर्वेक्षणाचे काम दोन तीन महिन्यात पूर्ण करण्यात येऊन घरपट्टी आकारणी मोहीम सुरू होणार आहे.

यावेळी त्यांनी सांगितले की,मुरुड शहरातील जी घरे ५० वर्षापूर्वीची आहेत. त्यांना घरपट्टी मध्ये ५० टक्के वाढ करण्यात येणार आहे.जी घरे ५० वर्षाच्या आतील असतील त्यांना १५ टक्के घरपट्टी मध्ये वाढ करण्यात येणार आहे.घरपट्टी ही दर चार वर्षानंतर नव्या दरात आकारणी करण्याची प्रक्रिया करण्यात येत असते त्याप्रमाणे ही आकारणी करण्यात येणार आहे.

सध्या पाणी पट्टी मध्ये १५ टक्के वाढ सुधा करण्यात आली आहे.सन २०२४२५ वर्षामध्ये मुरुड नगरपरिषदेने एक कोटी २८ लाख ८९ हजार आठशे रुपये जमा झाले आहेत.मार्च अखेर पर्यंत मुरुड नगरपरिषदेने ८३ टक्के घरपट्टी वसूल केली आहे.तर पाणी पट्टी ८४ टक्के वसूल झाली असल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली. ज्या लोकांनी पाणी पट्टी व घरपट्टी थकवली आहे त्यांना प्रथम नोटीस व तद्नंतर त्यानं त्यांना लोकन्यायालयात दाद मागितली जाणार आहे परंतु कोणत्याही परस्थिती मध्ये आम्ही शंभर टक्के वसुलीचे उद्दिष्ट पार करण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे. घरपट्टी सर्वेक्षण चे काम २१ मे पासून सुरू करण्यात आले असून मुरुड शहरातील नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी केले आहे.

# माथेरानमध्ये ताडपत्रीची खरेदी तेजीत

**माथेरान : बातमीदार**

माथेरानमध्ये पावसाळापूर्व लागणारे प्लास्टिक बाजारात उपलब्ध झाले असून याच्या खरेदीसाठी नागरिकांची धावपळ सुरू झाली आहे.यंदाच्या वर्षी पावसाळा लवकर सुरू होत असल्याने या प्लास्टिक, ताडपत्रीचा खरेदी बाजार चांगलाच तेजीत आला आहे. मान्सून दारात येऊन ठेपल्याने येथील नागरिक आपल्या घरांसाठी आणि येथील अश्वपाल देखील आपल्या घोड्यांच्या तबेल्यासाठी ताडपत्री खरेदी करताना दिसत आहेत.तसेच घोड्यांचे खाद्य गवत, भूसा, कुट्टी या सर्व पावसाळ्यापूर्वी व्यवस्थितपणे प्लास्टिक बंद करून झाकून ठेवण्यासाठी प्लास्टिकची खरेदी सुरू असलेली लगबग ही सगळीकडे पहावयास मिळत आहे.यंदा पावसाचे आगमन लवकर असल्याने यावर्षी सुद्धा पावसाळा सुरू होण्यापूर्वी वाहणाऱ्या जोराच्या वाऱ्याने आपल्या घराचे किंवा दुकानांचे छप्पर,पत्रे उडून नुकसान होऊ नये यासाठी अगोदरच प्लास्टिक कापड यावर टाकून बांधून ठेवत आहेत. अश्वपालक जयराज बर्गे यांनी आमच्या घोड्यांच्या तबेल्यात पावसाचे पाणी जाऊ नये यासाठी ताडपत्रीचा वापर करण्यात येतो. त्यांना पावसाळ्यात लागणारा अन्नसाठा देखील आम्ही सर्व अश्वपालक जमा करून ठेवत असतो आणि तो अन्न साठा येथे कधी अतिवृष्टीमुळे खराब होऊ नये, वाया जाऊ नये यासाठी काळजीपूर्वक ताडपत्रीचा वापर करून बांधून ठेवला जातो असे सांगीतले.

> **पावसाळ्यात आमच्या हॉटेलमध्ये काही प्रमाणात पर्यटक येत असतात. येथे जोरदार बरसणाऱ्या पावसाचा त्यांना रूम्समध्ये कोणत्याही प्रकारे त्रास होऊ नये यासाठी आम्ही आमचे सगळे रूम प्लास्टिक किंवा ताडपत्री कापडाने चांगले बांधून घेतो.**
>
> **-सुधीर जाधव, हॉटेल व्यवस्थापक, माथेरान**





**माणगाव : छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबीर अभियान अंतर्गत तलाठी भवन येथे विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले. त्या वेळी उपस्थित मंडळ अधिकारी जमखंडी व विविध सजांचे तलाठी.**

# एकात्मिक फलोत्पादन विकास कार्यक्रमात सहभागाचे आवाहन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

एकात्मिक फलोत्पादन विकास कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करणे आवश्यक आहे. यासाठी आपल्या नजिकच्या आपले सरकार ई-सेवा केंद्रामधे जाऊन किंवा https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करावा. अधिक माहितीसाठी गावपातळीवरील कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी फलोत्पादनाशी निगडीत योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान सन २०२५-२६ अंतर्गत फळे, फुले, मसाला लागवड, अळिंबी उत्पादन प्रकल्प व जुन्या फळबागांचे पुनरूज्जीवन हे घटक राबविण्यात येत आहे. यामध्ये विदेशी फळे, फुले, मसाला लागवड व आंबा या फळपिकांच्या जुन्या फळबागांचे पुनरूज्जीवन करणे तसेच अळिंबी उत्पादन प्रकल्प उभारणी करणे या बाबीचा समावेश आहे. जिल्हयामध्ये विदेशी फळे, फुले, मसाला या पिकांचे क्षेत्र व उत्पादन वाढविणे तसेच जुन्या फळबागांची उत्पादकता वाढविणे या दृष्टीने हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

या घटकांना अनुदान मर्यादा एकूण खर्चाच्या ४० टक्के ६०:४० या प्रमाणात प्रती हेक्टर अनुदान देण्यात येणार आहे.


**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

दूरध्वनी कार्यालयः-०२२-२७४५८०४०,४१,४२ फॅक्स :- ०२२-२७४५२२३३
ई-मेल :- panvelcorporation@gmail.com वेबसाईट www.panvelcorporation.com

**नागरिकांना जाहिर आवाहन**

पनवेल शहरातील नागरिकांना सुचित करण्यात येते की, पनवेल शहराला होणारा पाणी पुरवठा करणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील होणारा पाणीपुरवठा **बुधवार दि. २८/०५/२०२५ सकाळी ९.०० ते गुरूवार दि. २९/०५/२०२५ रोजी सायंकाळी ९.००** वाजेपर्यंत ३६ तास बंद राहणार आहे. त्यामुळे शहरामध्ये सदर दिवशी कमी दाबाने व अवेळी पाणीपुरवठा करण्यात येणार आहे.

अ) **बुधवार दि. २८/०५/२०२५ रोजी खालील भागात पाणी पुरवठा सुरू राहिल.**

१) हरिओमनगर उंच जलकुंभ, ठाणानाका रोड उंच जलकुंभ, एच.ओ.सी. उंच जलकुंभ (अर्धा भाग), भाजी मार्केट उंच जलकुंभ, मार्केट यार्ड उंच जलकुंभ येथून पाणी पुरवठा सुरू राहिल व उर्वरित भागातील पाणीपुरवठा बंद राहिल.

ब) **गुरुवार दि. २९/०५/२०२५ रोजी खालील भागात पाणी पुरवठा सुरू राहिल**

१) गंगाराम सिनेमा उंच जलकुंभ, पटेल मोहल्ला उंच जलकुंभ, सर्व्हिस हौद गोल टाकी, चौकीनी टाकी येथून होणारा पाणीपुरवठा सुरू राहिल व उर्वरित भागातील पाणीपुरवठा बंद राहिल.

तसेच पुढील २ ते ३ दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. तरी नागरिकांनी याची नोंद घेवून मिळणारे पाणी जपून वापरावे, पाण्याचा अपव्यय टाळावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे ही विनंती.

जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२५/
प्र.क्र.२१८/२२१/२०२५
दिनांक :- २२/०५/२०२५

सही/-
शहर अभियंता
पनवेल महानगरपालिका

# मान्सूनपूर्व कामे लवकर मार्गी लावा

## नवी मुंबई पालिका आयुक्तांचे आढावा बैठकीत निर्देश



**नवी मुंबई : बातमीदार**

मान्सून दरवर्षीपेक्षा लवकर दाखल होण्याचे अनुमान हवामान विभागाने व्यक्त केले असून त्या अनुषंगाने पावसाळापूर्वीच्या सुरु असलेल्या कामांना गती द्यावी, असे निर्देश देत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी सर्व विभागांच्या पावसाळापूर्व कामांचा सविस्तर आढावा घेतला. या वेळी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार व डॉ. राहुल गेठे तसेच सर्व विभागप्रमुख, विभाग अधिकारी तथा सहा.आयुक्त, कार्यकारी अभियंता आणि संबधित अधिकारी उपस्थित होते.

या आढावा बैठकीत मान्सुनपूर्व कामांची विभागनिहाय सद्यस्थिती आयुक्तांनी जाणून घेतली. मुख्यालयातील आपत्ती नियंत्रण कक्ष २४ x ७ सुरू असून या ठिकाणी १८००२२२३०९ आणि १८००२२२३१० हे दोन टोल फ्री क्रमांक तसेच २७५६७०६० व २७५६७०६१ हे दोन संपर्कध्वनी क्रमांक सुरू आहेत. या टोल फ्री क्रमांकांना ४ ते ५ मल्टीपल लाईन्स जोडून घ्याव्यात जेणेकरून हे क्रमांक व्यस्त राहणार नाहीत व नागरिकांना संपर्कासाठी सतत उपलब्ध राहतील, असे निर्देश आयुक्तांनी दिले.

**नियंत्रण कक्ष**

या मध्यवर्ती आपत्ती नियंत्रण कक्षाप्रमाणेच आठ विभाग कार्यालये व पाच अग्निशमन केंद्रे या ठिकाणीही नियंत्रण कक्ष सुरु करावेत व हे सर्वांचे संपर्क क्रमांक नागरिकांच्या माहितीसाठी व्यापक प्रमाणात प्रसिध्द करावेत, असेही आयुक्तांमार्फत सूचित करण्यात आले.

**नाले व गटारे सफाई**

नाले व गटारे सफाईच्या सुरू असलेल्या कामांना अधिक गती द्यावी व त्यामधून काढलेला गाळ लगेच उचलून घेण्यात यावा अशा स्पष्ट सूचना आयुक्तांनी दिल्या. रस्त्यावरील खोदकाम पूर्णपणे थांबविण्यात आले असून झालेल्या खोदकामांची पुनर्सुधारणा त्वरीत करुन घेण्यात यावी व त्याकडे बारकाईने लक्ष द्यावे, असे निर्देश देण्यात आले.

**धोकादायक इमारतींची पाहणी**

विभाग कार्यालयांमार्फत अतिक्रमण व नगररचना विभाग यांच्या माध्यमातून धोकादायक इमारतींची पाहणी करुन त्याची यादी प्रसिध्द करण्यात यावी तसेच सी वन कॅटेगरीतील ६६ इमारतींमधील रहिवास भविष्यात होणारी संभाव्य हानी टाळण्याच्या दृष्टीने बंद करण्यात यावा अशा सूचना करण्यात आल्या. या धोकादायक इमारतींची यादी वेबसाईट व वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्यात यावी, असेही निर्देश देण्यात आले.

**औषधांचा पुरेसा साठा**

पावसाळा कालावधीत उद्भवणाऱ्या आजारांवरील प्रतिबंधात्मक औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध करून ठेवण्यात यावा.

**वृक्ष छाटणीची कामे**

पावसाळापूर्व कालावधीत सुरू असलेली वृक्ष छाटणीची कामे जलद पूर्ण करून घेण्याबाबत उद्यान विभागास आयुक्तांनी निर्देश दिले.

**स्थलांतरासाठी नियोजन**

पावसाळा कालावधीत नागरिकांना स्थलांतरीत करावे लागल्यास आपापल्या विभागातील समाज मंदिरे तसेच निवास जागा अशा तात्पुरत्या निवारा केंद्रांची पाहणी करून नियोजित यादी तयार करून ठेवण्यात यावी. या निवारा केंद्रात नागरिकांना तात्पुरता निवारा उपलब्ध करून द्यायचा झाल्यास त्यांच्याकरीता खानपान व्यवस्थेचीही पूर्वतयारी करून ठेवावी, असे निर्देशित करण्यात आले. दरडप्रवण क्षेत्रामधील रहिवासी स्थलांतरीत करण्याबाबत अडथळा आणणाऱ्या झोपड्या स्थलांतरीत करण्याबाबत कार्यवाही करण्याचेही सुचित करण्यात आले.

# गती मर्यादा उपकरणे बंधनकारक करण्याची कार्यवाही सुरू

**पनवेल : वार्ताहर**

विविध प्रकारची व्यावसायिक वाहने भरधाव पळवू नयेत. त्यामुळे अपघातावर नियंत्रण यावे. म्हणून केंद्र शासनाच्या आदेशाने १४ वर्षांपूर्वी स्पीड गव्हर्नर म्हणजेच गती मर्यादा उपकरणे व्यावसायिक वाहनात कार्यान्वित करण्यात आली. त्या अनुषंगाने व्यावसायिक चालकांनी शासनाच्या आदेशाने कार्यवाहीदेखील केली, परंतु अलीकडे राज्यात अचानक परिवहन विभागाकडून निवडक उत्पादकांकडून गती मर्यादा उपकरण बसविण्याची सक्ती केली. यामुळे नाहक या व्यावसायिक वाहनचालकावर आर्थिक बोजा पडू लागला. त्यामुळे नवी मुंबईसह राज्यातील सर्वच व्यावसायिक वाहनचालकांनी फिटनेस नूतनीकरणाचा शुल्क भरण्याचे बंद केल्याने कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत आहे.

देशभरात व्यावसायिक वाहनांवर स्पीड गव्हर्नर (गती मर्यादा उपकरणे) बसवणे २०११ पासून केंद्र सरकारने बंधनकारक केले आहे. इतर बहुतांश राज्यांनी याचे तातडीने पालन सुरू केले होते तसेच राज्यातदेखील सुरू होते, मात्र महाराष्ट्र परिवहन विभागाने २०२४-२५पासून अचानक निवडक उत्पादकांकडून मिळणाऱ्या १६ अंकी क्रमांकाच्या




एसएलडीची सक्तीने अंमलबजावणी सुरू केली आहे आणि हे महागडे असल्याने व्यावसायिक वाहन चालकांचे म्हणणे आहे.

आजच्या परिस्थितीमध्ये बहुसंख्य वाहनांवर आधीपासूनच वैध स्पीड गव्हर्नर बसवलेले आहेत. ते वाहन विभागाच्या 'वहन' प्रणालीमध्ये नोंदणीकृत देखील आहेत. तरीही आता परिवहन विभागाने फक्त निवडक उत्पादकांकडून येणाऱ्या १६ अंकी क्रमांकाच्या नवीन उपकरणांची सक्ती केली आहे. त्यामुळे २५ एप्रिल २०२५ पासून संपूर्ण महाराष्ट्रात फिटनेस नूतनीकरणासाठीचा शुल्क भरणे बंद झाले असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे परिवहन विभागाला आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे.

यापूर्वीही ७ फेब्रुवारी २०२५ रोजी हाच प्रकार घडला होता, तेव्हा विभागाने हा तांत्रिक बिघाड असल्याचे स्पष्टीकरण दिले होते, मात्र दोन महिन्यांनंतर तोच प्रकार पुन्हा घडत असल्याचे व्यावसायिक वाहनचालकांचे म्हणणे आहे.

**वाहन फिटनेस व नूतनीकरण प्रक्रिया तत्काळ पुन्हा सुरू करावी. पूर्वीपासून बसवलेले कार्यक्षम व वैध एसएलडी स्वीकारावेत. १६ अंकी क्रमांकाची सक्ती रद्द करावी. वाहनधारकांना झालेल्या नुकसानीबद्दल भरपाई द्यावी व दुरुस्तीकडे तत्काळ पावले उचलावीत. तसेच याबाबत नवी मुंबईसह परिवहन विभागाला आम्ही निवेदन दिले आहे.**

**-हरप्रीत सिंग माणिकताला,**
प्रदेश सरचिटणीस, संयुक्त ट्रान्सपोर्ट संघटना, भाजप

विशेष म्हणजे ३० एप्रिल २०२५ रोजी एमओआरटीएच हेल्पडेस्ककडून आलेल्या ई-मेलमध्ये स्पष्ट सांगितले आहे की, ही बाब महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाशी संबंधित आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी संपर्क साधावा, परंतु परिवहन कार्यालयाशी संपर्क साधल्यावर तिथेही काहीही फायदा होत नसल्याचे व्यावसायिक वाहन चालकांचे म्हणणे आहे.

वरिष्ठांच्या आदेशाने ही कार्यवाही सुरू असल्याचे नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन अधिकारी दत्तात्रेय सांगोलकर यांनी सांगितले.

# कोरोनाच्या पार्श्वभूमीवर उपाययोजनांबाबत चर्चा



**पनवेल : वार्ताहर**

कोरोना संक्रमणाच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांची भेट घेऊन आवश्यक त्या उपाययोजनांसदर्भात मागणी केली.

वाढत्या कोरोना संकटाबाबत चर्चा आणि उपाययोजनांबाबत शिवसेना पक्षाच्या वतीने पदाधिकाऱ्यांनी पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्याशी चर्चा करताना पूर्ण जगभरात, भारतात, तसेच महाराष्ट्रातील ठिकठिकाणी कोरोना संक्रमण पुन्हा डोकं वर काढीत असून, रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या अनुषंगाने महानगर संघटक मंगेश रानवडे यांच्या अध्यक्षतेखाली शिवसेना पक्षाचे पदाधिकारी यांनी पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे व महानगरपालिकाच्या पदाधिकाऱ्यांबरोबर याबाबत सखोल चर्चा केली.

शिवसेना पक्षाच्या शिष्टमंडळामध्ये उपस्थित असलेले महानगर प्रमुख प्रथमेश सोमण, पनवेल शहर प्रमुख प्रसाद सोनवणे, खारघर शहर संघटक इम्तियाज शेख, विभाग संघटिका ज्योती नाडकर्णी, पनवेल उपशहर प्रमुख अर्जुन परदेशी, पनवेल उपसघटक सिद्धेश खानविलकर, पनवेल शहर प्रसिद्धी प्रमुख तोफिक बागवान, उपविभाग प्रमुख गुलाब बागवान यांनी आयुक्तांना कोरोना संकटाला आळा घालण्यास विविध उपाय योजनांची मागणी केली. त्यामध्ये लसीकरण क्वारंटाईन वार्ड उभा करणे, कोरोना टेस्टिंगची यंत्रणा उभी करणे अशा विविध मागण्या नमूद केलेले निवेदन पनवेल महानगरपालिकेला सादर केले.

आयुक्त मंगेश चितळे यांनी याबाबत शिष्टमंडळात माहिती देताना नमूद केले की सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच आपला दवाखाना मध्ये, कोरोना संबंधित अतिदक्षता व लक्षण असल्यास त्वरित ट्रीटमेंट संबंधी आदेश जारी केलेले आहेत व त्याचप्रमाणे खाजगी रुग्णालयांमध्येसुद्धा याबाबतची सतर्कता सर्व डॉक्टरांना देण्यात येणार आहे.

# जीवनात ध्येय संपादन करण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही -सुखदा म्हात्रे

**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

जीवनात ध्येय संपादन करावयाचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही, असा मौलिक सल्ला प्राचार्य तथा संस्थेच्या खजिनदार सुखदा म्हात्रे यांनी दिला.

ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेच्या रामचंद्र म्हात्रे विद्यालय अँण्ड कनिष्ठ महाविद्यालयाचा कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील बारावीच्या तिन्ही शाखेतील परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला असून यशस्वी विद्यार्थ्यांचा




आणि त्यांना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान संस्थेच्या वतीने नुकताच करण्यात आला होता. त्यावेळी प्राचार्य सुखदा म्हात्रे या आपल्या भाषणात बोलत होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विश्वस्त तथा प्राचार्य राजेंद्र म्हात्रे यांनी भूषविले होते.

यात कला शाखेत संस्कृती धनंजय वर्तक ७६ टक्के (प्रथम) विज्ञान शाखेत गौरव साईनाथ गावंड (७३.५०) टक्के (प्रथम)व वाणिज्य शाखेत मितेश मारुती म्हात्रे (६७.५०) टक्के गुण प्राप्त करून यशस्वी झाले. या समारंभाला माजी प्राचार्य व ज्येष्ठ साहित्यिक ए.डी. पाटील, सेवानिवृत्त सहाय्यक शिक्षक निरीक्षक प्रकाश पाटील, प्राचार्य विविध गाव सुविद्य गावंडे प्राचार्य सुभाष ठाकूर संस्थेच्या मेघा म्हात्रे, प्रभाकर म्हात्रे, प्राचार्य सुविद्य गावंड, सुयश म्हात्रे यांची उपस्थिती होती.

प्राचार्य सुभाष ठाकूर यांनी स्वागत केले. शिवहरी गावंड यांनी सूत्रसंचालन केले. आभार विलास काटे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला, विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर सेवक वृंद उपस्थित होते.

# बचत गटांमार्फत मालमत्ता कर बिलांचे घरपोच वितरण

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका आर्थिक वर्ष २०२५-२६ साठीच्या मालमत्ताकर देयकांच्या घरपोच वितरणास २३ मे २०२५ पासून सुरुवात होत आहे. त्यासाठी नोंदणीकृत बचत गटांतील महिलांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

या बचत गटांच्या महिलांना महानगरपालिकेच्या वतीने या कामासाठी तात्पुरत्या स्वरूपातील ओळखपत्रे देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने या महिलांना खाजगी व शासकीय सोसायट्या, वसाहती व गृहसंकुलांमध्ये प्रत्येक घरापर्यंत विनाअडथळा प्रवेश दिला जावा; त्यांच्याकडून मालमत्ताकर देयक स्विकारावे व मालमत्ताधारक किंवा त्यांच्या भाडेकरूंनी संबंधित महिला प्रतिनिधींना आपल्या माहितीचे डिजीटलायझेशन करण्यासाठी मालमत्ताधारकाचे संपूर्ण नाव, वापरात असलेला मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडी ही माहिती संपूर्ण व अचूक स्वरूपात द्यावी असे आवाहन महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे



यांनी केले आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या मालमत्ताकर देयकांचे घरपोच वितरण करण्याकरिता नोंदणीकृत बचत गटांतील महिलांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या महिला मालमत्ताकर बिलांचे वितरण व मालमत्ता धारकांची माहिती संकलन करण्याचे काम महानगरपालिकेच्या अंशकालीन प्रतिनिधी म्हणून करतील. त्यानुसार या महिला प्रतिनिधींना संपूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

मालमत्ताकर बिले वितरित करण्यासाठी बचत गटांतील महिलांना मालमत्ताधारक किंवा त्यांच्या भाडेकरूंनी मालमत्ता धारकाचे संपूर्ण नाव, वापरात असलेला मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडी ही माहिती देणे आवश्यक आहे. ही माहिती मालमत्ताकर विभागाच्या डिजिटल प्रणालीमध्ये अद्ययावत करण्यात येईल, जेणेकरून भविष्यात मालमत्ताकर बिल, कराविषयीच्या सूचना व त्याविषयीचे पेमेंट रिमाइंडर मोबाईलवर सहजपणे मिळू शकतील. बचत गटाच्या महिला प्रतिनिधींना सन्मानपूर्वक वागणूक देणे अपेक्षित आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेचे मालमत्ताकर देयक प्राप्त होणे व देयक रक्कम अदा करणे ही कार्यवाही मालमत्ता धारकास कोणत्याही महापालिका कार्यालयात जावे न लागता घरबसल्या ऑनलाईन करता यावी यादृष्टीने मालमत्ता धारकांची माहिती संकलित करण्यात येत असून त्यादृष्टीने प्रत्येक मालमत्ता धारकाची माहिती बचत गटाच्या महिला प्रतिनिधींना उपलब्ध करून देऊन नागरिकांना डिजीटलायझेशनव्दारे सुलभ सेवा उपलब्ध करून देण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेस संपूर्ण सहकार्य करावे असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# भूपेंद्र गायकवाड यांना क्रीडा रत्न पुरस्कार प्रदान



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मास्टर भूपेंद्र मार्शल आर्ट स्पोर्ट्स अँड फिटनेस अकॅडमीचे संस्थापक, इंडिया ब्लॅक बेल्ट असोसिएशनचे राज्य सचिव आणि एमेच्युअर किकबॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशन उपाध्यक्ष या भूमिकेतून त्यांनी हजारो विद्यार्थ्यांचे आयुष्य सकारात्मकपणे घडवले आहे. त्यांना छावा प्रतिष्ठान नवी मुंबई यांच्या वतीने आयोजित इंडियन नॅशनल अवॉर्ड २०२५ म्हणजेच राष्ट्रीय क्रीडा रत्न पुरस्कार २०२५ यावर्षीचा मास्टर भूपेंद्र शिवाजी गायकवाड यांना प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार कुणाल मालुसरे, वीर धाराउमाता गाडे पाटील, अमित गाडे पाटील, सचिन भोसले पाटील, अमित गडांकुश यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. भुपेंद्र शिवाजी गायकवाड यांना राष्ट्रीय क्रीडारत्न पुरस्कार मिळाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**क्लिक...क्लिक...!**



उरण : बगळा सर्वत्र आढळणारा पक्षी आहे. त्याचे मुख्य खाद्य छोटे मासे, किडे, बेडूक, अळ्या, काही प्रकारचे शेवाळी असते. अशाच काही बगळ्यांचे भक्षक शोधत असताना टिपलेले छायाचित्र.

# बदलीबाबत शिफारशीसाठी नागरी सेवा मंडळ स्थापन

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सर्व संवर्गातील अधिकारी, कर्मचारी यांच्या बदलीबाबत सक्षम प्राधिकारी अर्थात आयुक्त तथा प्रशासक यांना शिफारस करण्यासाठी महानगरपालिका स्तरावर शासनाच्या धर्तीवर 'नागरी सेवा मंडळ' गठीत करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार सदर नागरी सेवा मंडळ गठीत करण्यात आले असून या मंडळाचे अध्यक्ष अतिरिक्त आयुक्त (१) हे असणार आहेत. त्याचप्रमाणे शहर अभियंता, मुख्य लेखा परीक्षक, उपायुक्त (शिक्षण) हे या मंडळाचे सदस्य असणार आहेत. प्रशासन विभागाचे उपआयुक्त या नागरी सेवा मंडळाचे सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील संबधित संवर्गातील अधिकारी, कर्मचारी यांच्या बदली / पदस्थापना याबाबतच्या शिफारशींचे प्रस्ताव महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाने नागरी सेवा मंडळासमोर सादर करतांना महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार कार्यवाहीबाबत तसेच प्रस्तावित बदल्यांबाबतची पार्श्वभूमी / वस्तूस्थिती सक्षम प्राधिकारी अर्थात आयुक्त याच्या निदर्शनास आणणे आवश्यक असेल.

बदली / पदस्थापनेबाबतच्या प्रस्तावावर नागरी सेवा मंडळाकडून शिफारस प्राप्त झाल्यावर, सदर प्रस्ताव सक्षम प्राधिकारी अर्थात आयुक्त यांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल. या प्रकरणी सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर सक्षम प्राधिकारी यांच्या स्तरावर अंतिम निर्णय घेण्यात येईल.

बदली प्रस्तावांवर महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणे नागरी सेवा मंडळावर बंधनकारक राहील.

नवी मुंबई महानगरपालिकेचे प्रशासन लोकाभिमुख असावे व गतीमानतेसोबतच पारदर्शक कामकाज व्हावे याकडे महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांचे बारकाईने लक्ष असून महापालिका आस्थापनेवरील अधिकारी, कर्मचारी यांच्या पदस्थापना व बदल्यांबाबत नागरी सेवा मंडळ स्थापन करुन आणखी एक सकारात्मक पाऊल उचलण्यात आले आहे.

# रोह्यात नालेसफाईचे काम युद्धपातळीवर



**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात अवकाळी पाऊस पडल्याने जनजीवन विस्कळित झाले होते.पाऊस पडल्याने शहरातील रस्त्यांवर काही ठिकाणी नाल्यातुन पाणी बाहेर पडले होते. नाला तुंबल्याने नगरपरिषदच्या वतीने नालेसफाईचे काम युद्ध पातळीवर सुरू झाले. अधिकाऱ्या वर्ग जातीने नालेसफाईकडे लक्ष देत होते.

गेली दोन दिवस पडत असलेल्या पावसामुळे गटारे, नाले तुंबल्याने माजी उपनगराध्यक्ष महेश कोलटकर, माजी गटनेते महेंद्र गुजर, माजी उपनगराध्यक्ष समीर सकपाळ स्वता उभा राहुन काम करून घेत होते.

नगर परिषदेचे बाजारपेठेत नाल्यांमध्ये प्लास्टिक पिशव्या व बाटल्या मोठ्या प्रमाणात आढळल्याने पाण्याचा निचरा होत नव्हता. नगरपरीषदेचे अधिकारी मनोज पुलेकर, निवास पाटील यांनी सकाळी बाजारपेठेत जात सफाई कामगाराच्या माध्यमातून अडकलेले प्लास्टिक बाटल्या व पिशव्या काढण्यात येत होते. मोठ्या प्रमाणावर कचरा गटारात आढळुन आले आहे.

गेली दोन दिवस रोहा शहरात मुसळधार पाऊस पडल्याने जनजीवन विस्कळित झाले होते. पहिल्याच पावसात गटारी संपल्याचे चित्र रोह्यात तील बाजारपेठेत दिसून आले. काही दुकानात पाणी गेल्याचेही आढळून आले. त्यामुळे नगरपालिकेने नालेसफाईचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे.

मंगळवारी सायंकाळी व बुधवारी सायंकाळी जोरदार पाऊस पडल्याने सगळीकडे पाण्याचे वातावरण दिसून आले. गुरुवारी ही पावसाने जोरदार हजेरी लावली आहे.

# माणगावमध्ये विजेच्या शॉकने चार जनावरे दगावली



**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

माणगाव तालुक्यातील भाले ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या चांदेवाडी व बोंडशेत गावच्या मध्यात बुधवारी विजेच्या गडगडाटात महावितरणची हायटेन्शन लाईन कंडक्टर तुटून विद्युत प्रवाहित लाईन खाली पडल्याने माळरानावर पडल्याने चरणाऱ्या चार गुरांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

यामध्ये चांदेवाडी गावचे शेतकरी महादेव सोनू आंबेकर यांचे शेती कामाचे दोन बैल तसेच चांदेवाडी गावाचे ग्रामस्थ अनंत पांडुरंग शिगवण यांची गाभण गाय व बोन्डशेत गावचे शेतकरी दीपक गोविंद चव्हाण यांची गाभण गाय अशा जनावरांचा समावेश आहे.

घटनास्थळी माणगांव पोलीस, महावितरण अधिकारी व कर्मचारी, वन अधिकारी व कर्मचारी तसेच भाले सरपंच दत्ताराम खांबे, ग्रामसेवक राहुल ठाकूर, उपेंद्र जाधव, सागर खानविलकर व स्थानिक ग्रामस्थ यांच्या समक्ष पंचनामा करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना येन शेतीच्या कामाच्यावेळी मोठे नुकसान सहन करावे लागले आहे.

यामध्ये महावितरणचा हलगर्जीपणा दिसून येत आहे. असे आरोप चांदेवाडी व बोंडशेत गावातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केला आहे. तसेच ह्या नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना लवकरात लवकर आणि योग्य मदत महावितरण कंपनी व शासनाकडून मिळावी, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकरी भाले सरपंच खांबे, सामाजिक कार्यकर्ते सागर खानविलकर व उपेंद्र जाधव तसेच स्थानिक ग्रामस्थ संतोष जागडे यांनी पत्रकारांशी बोलताना केली आहे.

घटनास्थळी महावितरणचे सहायक अभियंता एस बी सोननीस यांनी पंचनामा केला आहे. ते पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, आम्ही पंचनामा करून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करणार आहोत संबंधित निर्णय कंपनी प्रशासन घेईल.

# महाराष्ट्र वनविभाग व नागाव ग्रामपंचायतीचा सामंजस्य करार

## नागाव बीचला पर्यटनस्थळ बनविण्याचा निर्धार

**रेवदंडा : प्रतिनिधी**

ब्लू फलॅग हे प्रतिष्ठीत आंतराराष्ट्रीय प्रमाणपत्र मिळविण्यासाठी नागाव बीच ला पर्यावरण पुरक व आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटनस्थळ बनविण्याचा निर्धार महाराष्ट वनविभाग व नागाव ग्रामपंचायतीच्या सामंजस्य करार माथेरान येथे नुतन वनपरिक्षेत्र कार्यालयाचे उद्घाटनावेळी करण्यात आला.





माथेरान येथे राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत नुतन वनपरिक्षेत्र कार्यालयाचे उद्घाटन कार्यक्रम झाला. या वेळी महाराष्ट्र वनविभाग आणि नागाव ग्रामपंचायत यांच्यात एक महत्त्वपुर्ण सामजस्य करार करण्यात आला. या कराराचा उद्देश नागाव बीचला ब्लू फलॅग हे प्रतिष्ठीत आंतराराष्ट्रीय प्रमाणपत्र प्रमाणपत्र मिळविण्यासाठी नागाव बीचला पर्यावरण पुरक व आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटनस्थळ बनविण्याचा निर्धार महाराष्ट्र वनविभाग व नागाव ग्रामपंचायतीच्या सामंजस्य कराराने करण्यात आला. या करारावर प्रमुख अतिथी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आली. या वेळी जिल्हाचे वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी, वनविभागाचे प्रतिनिधी, पर्यावरण तज्ञ, तसेच स्थानिक नेते मंडळी या कार्यक्रमास उपस्थित होते. ब्लू फलॅग हे प्रतिष्ठीत आंतराराष्ट्रीय पर्यावरण सन्मानचिन्ह असून या माध्यमातून स्वच्छता, सुरक्षितता, आणि पर्यावरणीय शाश्वततेच्या जागतीक निकषांची पुर्तता करणाऱ्या समुद्रकिनाऱ्यांना दिली जाते.

या वेळी राज्य वनमंत्री गणेश नाईक यांनी नमुद केले की, हा पुढाकार राज्याचा पर्यटन विकास धोरणाशी सुसंगत असून महाराष्ट्राच्या उच्च दर्जाया इको-पर्यटनाला चालना देणारा आहे असे म्हटले तसेच नागाव ग्रामपंचायतीच्या सरपंच हर्षदा निखिल मयेकर यांच्या प्रयत्नांचे त्यांनी कौतुक केले. तर नागाव ग्रा.प. सरपंच हर्षदा मयेकर यांनी या भागीदारीचे स्वागत करताना म्हटले की, यामुळे नागाव बीचच्या शाश्वत विकासासाठी नवीन दारे उघडतील, ज्यात स्थानिक रोजगार संधी आणि जागतिक ओळख यांच्या समावेश असेल.

महाराष्ट वनविभाग व नागाव ग्रामपंचायतीच्या सामंजस्य करारासाठी अलिबागचे उपवनसंरक्षक राहूल पाटील यांनी महत्त्वपुर्ण भुमिका बजावली, तसेच वनविभागाच्या पुर्ण सहकार्याची ग्वाही दिली. या करारा अंतर्गत ग्रामपंचायत व वनविभाग यांच्या सयुक्त विदयमोन स्वच्छता, जैवविविधता संवर्धन, सांडपाण्याचे व्यवस्थापन, सुरक्षीतता, आणि पर्यटन सोयीसुविधा यावर विशेष भर दिला जाईल.

जर हा करार यशस्वीपणे राबविल्यास नागाव बीच ब्लू फलॅग हे प्रतिष्ठीत आंतराराष्ट्रीय प्रमाणपत्र मिळविणारा भारतातील १४ वा आणि महाराष्ट्रातील पहिला समुद्र किनारा ठरेल. ज्यामुळे रायगच जिल्ह्याचा नावलौकिक राष्ट्रीय स्तरावर उंचावेल.

## माणगावमध्ये आज तिरंगा यात्रा

**माणगाव :** भारतीय वीर जवान आपले प्राण पणाला लावून देशाच्या सुरक्षिततेसाठी सतत तत्पर असतात, त्यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी व संपूर्ण देशातील जनता ही जवानासोबत आहे हा संदेश पोहचण्यासाठी माणगांव शहर व तालुक्यातील नागरिकांच्या वतीने शनिवारी (दि.२४) सैनिकांच्या शौर्याला अभिवादन करण्यासाठी 'तिरंगा यात्रा' आयोजित करण्यात आली आहे.

माणगाव बस स्थानक कचेरी रोड ते वीर यशवंत घाडगे स्मारक असा हा तिरंगा यात्रेचा मार्ग आहे. या यात्रेकरिता तिरंगा झेंड्याची व्यवस्था करण्यात आली असून हि यात्रा वेळेत सुरू होईल. तिरंगा यात्रा शहीद स्मारकपर्यंत पोहोचल्यावर तालुक्यातील आजी माजी सैनिक व कुटुंबियांचा सन्मान करण्यात येणार आहे. ही देशभक्तीचा संदेश देणारी असणार आहे. माणगावकर म्हणून मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन समस्त माणगाव शहर व माणगाव तालुक्यातील राष्ट्रभक्त नागरिक यांच्यातर्फे करण्यात आली आहे.

# पाण्यासाठी वाळवंटी ग्रामस्थांनी केलेले उपोषण मागे



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील उसरोली ग्रामपंचायत हद्दीतील वाळवंटी ग्रामस्थांना गेले सात वर्षे पाणी टंचाईला सामोरे जावे लागत होते. या गंभीर प्रश्नांकडे प्रशासन वेळ देत नसल्याने शेकडो च्या संख्येने महिलांसह भव्य महा मोर्चा काढण्यात आला होतो तसेच पाणीपुरवठा कमेटी अध्यक्ष-यशवंत पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी मुरुड तहसीलदार कार्यालया समोर आमरण उपोषणाला सुरुवात करण्यात आली होती.

सुरवातीला पंचायत समिती गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ व पाणीपुरवठा उप अभियंता निहाल चवरकर यांनी उपोषण घटनास्थळी येऊन उपोषणकर्ते यांना पत्र देऊन उपोषण मागे घेण्यास सांगितले, परंतु मुख्य मागण्या मान्य होत नसल्याने उपोषणकर्ते ठाम राहिले शेवटी प्रशासनाने नरमाईची भुमिका घेऊन लेखी मागण्या मंजूर केल्याचे पत्र उपोषणकर्तोना देण्यात आल्यानंतर पाणीपुरवठा कमेटी अध्यक्ष-यशवंत पाटील यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी पाणी पिऊन उपोषण मागे घेण्यात आले.

या वेळी पंचायत समिती गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ, नायब तहसीलदार संजय तवर, पोलिस निरीक्षक नामदेव बडगर, पंचायत समिती विस्तार अधिकारी-अशोक दांडेकर, पाणीपुरवठा उप अभियंता निहाल चवरकर, भरत बेलोसे, शिवसेना बांधकाम कामगार संघटनेचे अध्यक्ष दिनेश मिनमीने, मनोज कमाने, इन्तिखाब मुकरी, शैलेश पाटील, शब्बीर खतीब, नजीर नाखावाजी, शौकत नाखवाजी आदींसह शासकीय, अधिकारी व वाळवंटी ग्रामस्थ उपस्थित होते.

या वेळी पाणीपुरवठा कमिटी अध्यक्ष यशवंत पाटील म्हणाले की  की दलित वस्ती या योजनेच्या माध्यमातून तत्कालीन सरपंच व अधिकाऱ्यांनी दहा लाख रुपयांचा निधी वापरुन याठिकाणी कोणतेही काम झाले नाही या गैर व्यवहार कामाचा सखोल चौकशी करण्याकरिता कमेटी नेमली जाईल जे दोषी असतील त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करुन गुन्हा दाखल केला जाणार आहे. पेयजल योजना ७०००००० लाख रुपये खर्च करून ते ही काम अपूर्ण अवस्थेत आहे. ते ही लवकर पुर्ण होईल अश्या विविध मागण्या प्रशासनाकडुन मान्य करण्यात आलेल्या आहेत.

या मंजूर केलेल्या मागण्या जुन महिन्याच्या अखेरपर्यंत अंमलबजावणी झाली नाही तर पुन्हा उग्र आंदोलन करून आमरण उपोषण करुन मागण्या मान्य करून घेणार आणि महिलांना न्याय मिळवुन देणार अशी प्रतिक्रिया पाणीपुरवठा कमेटी अध्यक्ष यशवंत पाटील यांनी आमच्या प्रतिनिधीस दिली आहे.

# निजामपूर मंडळ कार्यालयात दाखल्यांचे वाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

गतिमान प्रशासनासाठी निजामपूर मंडळ विभागातील नागरिकांच्या विविध समस्यांचे निराकरण करणे व त्यांना लागणारे विविध दाखले छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियांनांतर्गत निजामपूर येथे घेण्यात आलेल्या कार्यक्रमात सुमारे २३७ विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले. या वेळी निजामपूर भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



महसूल विभागाच्या वतीने शेतकरी, विद्यार्थी, महिला यांच्या दैनंदिन प्रश्नाचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी निकाली काढण्यासाठी तसेच महसुल प्रशासन लोकाभिमूख गतिमान करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराचे महसुल मंडळ विभाग निजामपुर आयोजित करण्यात आले. श्रीविशन जावळे (भा.प्र.सं.) जिल्हाधिकारी रायगड, संदीपान सानप उपविभागीय अधिकारी माणगाव, तहसिलदार माणगाव दशरथ काळे यांचे मार्गदर्शनाखाली शिरीराचे आयोजन करण्यात आले. शिबिरांतर्गत जातीचे दाखले, उत्पनाचे दाखले, जिवंत ७/१२ मोहीम अंतर्गत ७/१२, पीएम किसान योजनेचे लाभार्थी, आधारकार्ड, नवीन शिधापत्रिका, संजय गांधी योजना लाभार्थी यांना नाभ देणेत आला व दाखले वाटप करण्यात आले विविध योजनांची माहिती देण्यात आली.

जिवंत ७/१२ मोहीम, पालकमंत्री पानंद रस्ते, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना, पीएम किसान योजना ग्रीस्टॅक योजना, संजय गांधी निराधार योजना अशा विविध शासकीय योजनांची माहिती निजामपूर मंडळ अधिकारी विद्या साळवे, निजामपूर तलाठी नितीन भोजरंगे, कालवण तलाठी मारुती चाटे, करंबेळी तलाठी सुकेशिनी राक्षसमोर, चाच तलाठी कमलेश चौखे, कांदळगाव तलाठी तन्मय देसाई, शिरसाड तलाठी सुनील टेळे व मंडळातील कोतवाल यांनी मार्गदर्शन करून हे शिबिर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

या वेळी निजामपूर विभागातील शेतकरी ग्रामस्थ व आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी जातीचे दाखले ३५, उत्पन्नाचे दाखले ३०, ग्रीस्टॅक योजने अंतर्गत किसान प्रमाणपत्र ४८, जिवंत ७/१२ मोहीम अंतर्गत वारस नोंद झालेल्या खातेदारांना ७/१२ वाटप १०१, पीएम किसान लाभार्थी ९, मतदान ओळखपत्र ४, आधारकार्ड ६, नवीन शिधापत्रिका वाटप २, संजय निराधार योजना २ असे २३७ दाखले वाटप करण्यात आले.

# नेरळ एसटी स्टँड परिसरात सिमेंट कॉँक्रीट व गटाराचे काम मंजूर

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात दोन ते तीन दिवस वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हाहाकार माजवला आहे. तर या पडलेल्या अवकाळी पावसामुळे नेरळ एसटी स्टँड परिसरात पाणी साचल्याने व चिखलसदृश्य परस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे नागरिकांना चिखलातून त्रासदायक प्रवास करण्याची परस्थिती होती. कोल्हारे ग्रामपंचायतीचे सरपंच महेश विरले यांनी नेरळ एसटी स्टँडच्या सिमेंट कॉँक्रीट व गटाराचे काम मंजूर झाले असून लवकरच भूमिपूजन होईल, असे सांगितले.



नेरळ बस स्टॅन्ड आणि असलेल्या रिक्षा स्टॅन्ड परिसरातून जवळपास असलेल्या नेक गावांकडे जाण्याचा मार्ग आहे तसेच नेरळ रेल्वे स्थानकाजवळ असल्याने नेरळ परिसर व आजूबाजूच्या असलेल्या खेडे गावातील मुंबई, कल्याण आदी भागात कामाला जाणारे ग्रामस्थ व प्रवाशांची मोठी वर्दळ असते, पण पाणी साचल्याने प्रवास करणे त्रासदायक व धोकादायक झाले आहे. तसेच जवळ नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्र असल्याने येणाऱ्या रुग्ण व गरोदर महिला वृद्ध नागरिकांसाठी परिस्थिती मोठी अडचणीची व त्रासदायक ठरत आहे.

कोल्हारे ग्रामपंचायतीचे सरपंच महेश विरले यांना विचारले असता या वेळी नेरळ एसटी स्टँड परिसरातील सिमेंट कॉँक्रिटीकरण व पाणी निचरा होण्यासाठी गटारांची कामे ही माझ्या पाठपुराव्यानुसार व कर्जत - खालापूर विधानसभा मतदार संघाचे विद्यमान आमदार महेंद्र थोरवे यांच्या प्रयत्नातून नेरळ संकुल विकास प्राधिकरण व रायगड जिल्हा परिषद अर्थसंकल्प २०२४ -२५ नुसार मंजूर झाले असुन, नेरळ एसटी स्टँड परिसर सिमेंट कॉँक्रिटीकरणाकरीता १५ लक्ष व पाणी निचरा होण्यासाठी गटारे बांधकामाकरीता १० लक्ष असा एकूण २५ लक्षाचा निधी मंजूर झाला असून, येत्या काही दिवसात या कामाचे भूमिपूजन आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते करून, सदर कामाला सुरवात करण्यात येईल असे सरपंच महेश विरले यांनी सांगितले.

# खोपोली आणि खालापुरात मान्सूनपूर्व कामांची लगबग

## नाका कामगारांना मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

मागील आठवड्यापासून सुरू असलेला मान्सूनपूर्व पाऊस व सततचे ढगाळ वातावरण तयार होत मधून मधून पाऊस पडत आहे. हवामान खात्याकडूनही मान्सून लवकर सक्रिय होत असल्याचे संकेत दिले आहेत. या पार्श्वभूमीवर खालापूर-खोपोलीत मान्सूनपूर्व कामांची लगबग सुरू झाली आहे.ही कामे वेळेत पूर्ण होण्यासाठी नाका कामगारांची मागणी वाढल्याने खोपोलीत सध्या नाका कामगारांना सुगीचे दिवस आले आहेत. कमीत कमी पाचशे ते सहाशे रुपये हजेरीप्रमाणे खोपोलीत नाका कामगार उपलब्ध होत आहेत.

या कामांत नगरपालिका कडून गटारी व नालेसफाई मोहीम सुरू आहे. शेतकऱ्यांकडून शेतीची पूर्व मशागतची कामे, बांधकाम क्षेत्राकडून सिमेंट सह इतर किमती साहित्य सुरक्षित ठेवण्यासाठी तात्पुरते छत निर्माण करण्याची लगबग सुरू आहे. वीट भट्टी वाल्यांकडून ताडपत्रीचे आच्छादन बनविन्याची कामे, सर्व सामान्य नागरिकांकडून घरांच्या छतांची डागडुजी करुन घेणे सुरू आहे. विविध सरकारी यंत्रणाकडून रस्त्यावरील खड्डे बुजविन्याची कामे, रस्त्याच्या बाजूला पाणी निचरा होण्यासाठी चर काढणे, विजवितरण कंपनीकडून अडथळा निर्माण होणाऱ्या झाडांच्या फांद्या काढणे, मोठी झाडे छाटने, विद्युत ताराची देखभाल करुन घेणे अशा सर्व कामे युद्ध स्तरावर सुरू आहेत. दुसरीकडे महिला वर्गाकडूनही घरगुती आवश्यक साहित्य खरेदीसह अन्नधान्य, मसाला व डाळीचा गरजेएवढा साठा केला जात आहे.





### *दोन ठिकाणी कामगार उपलब्ध*

***खोपोली शहरात नाका कामगार उपलब्ध होण्याची दोन ठिकाणे आहेत. दीपक चौक बाजारपेठ खोपोली व शीळफाटा इंदिरा चौक येथे मोठ्या प्रमाणावर नाका कामगार सकाळी सात ते नऊ वाजण्याच्या सुमारास जमा झालेली असतात. यात सामान्य मजूर, गवंडी, मिस्तरी, प्लंबर, फिटर आदी क्षेत्रातील कुशल कामगार ही उपलब्ध होतात. सामान्य मजुरीकामासाठी पुरुष ५००-६०० व महिला ४००-५०० तर कुशल कामगारांसाठी ७५० रुपये पासून १०००पर्यंत दिवसाचे मजुरी रेट आहेत.***

**खोपोली शहरातील नाले सफाई व गटारी स्वच्छता कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. मान्सून पूर्वीची अन्य कामे व डागडुजीची कामेही जोरदार सुरू आहेत.**

**-डॉ. पंकज पाटील**, मुख्याधिकारी, खोपोली

**पावसाळी हंगामात अन्न धान्य, कडधान्ये, डाळी, कांदे व लसूण आदि आवश्यक वस्तुचे बाजार भाव वाढतात तसेच चांगल्या वस्तु मिळतील याची खात्री नसते. म्हणून पावसाळी हंगामात पुरेल एवढा आवश्यक साठा करण्याची पारंपरिक पद्धत आहे.**

**-निशा प्रमोद पाटील**, गृहिणी, खोपोली

# लखनऊकडून गुजरातला पराभवाचा धक्का



**लखनऊ : वृत्तसंस्था**

प्लेऑफच्या शर्यतीतून आउट झालेल्या लखनऊच्या संघाने घरच्या मैदानात खेळणाऱ्या आणि क्वालिफायर १ खेळण्याचे स्वप्न पाहणाऱ्या गुजरात टायटन्सला पराभवाचा धक्का दिला. या पराभवामुळे पहिल्या दोनमध्ये टिकून राहण्याचे मोठे चॅलेंज त्यांच्यासमोर उभे राहिले आहे.

मिचेल मार्श ११७ (६४)चे दमदार शतक आणि निकोलस पूरन ५६ (२७) याच्या अर्धशतकाच्या जोरावर लखनऊच्या संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना निर्धारित २० षटकात दोन विकेट्सच्या मोबदल्यात २३५ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना साई सुदर्शन २१ (१६), शुबमन गिल ३५ (२०) आणि जोस बटलर ३३ (१८) हे तिघे पहिल्यांदाच १० षटकांच्या आत माघारी फिरले. अशा परिस्थितीत लखनऊच्या संघाच्या मध्यफळीची खरी कसोटी होती, पण त्यात फक्त शाहरूख खान अर्धशतकी खेळीसह काठावर पास झाला. बाकी सर्व नापास झाल्यामुळे गुजरात संघाने सामना गमावला.

मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करताना गुजरातची फॉर्मात असलेली जोडी स्वस्तात आटोपली. साई सुदर्शन १६ चेंडूत २१ धावा करून बाद झाला. कर्णधार शुबमन गिलने २० चेंडूत ३५ धावा करून मैदान सोडले. सलामी जोडीशिवाय फॉर्ममध्ये असलेला बटलरही १८ चेंडूत २२ धावा करून परतला.

शाहरूख खान आणि शेरफेन रुदरफोर्ड या दोघांनी मध्यफळीत आश्वासक खेळी केली, पण त्यांची कामगिरी सामन्यात ट्विस्ट आणू शकली नाही. रुदरफोर्ड २८ चेंडूत ३८ धावा करून बाद झाला. त्यानंतर शाहरुख एकटा पडला. त्याने जोर लावला, मात्र शेवटी २९ चेंडूत ५७ धावांवर त्याची खेळीही संपली. याशिवाय अन्य फलंदाजांनी नांगी टाकली. यात राहुल तेवतियासह अर्शद खानचा समावेश होता. त्यामुळे त्यांना पराभवाचे तोंड पहावे लागले.

तत्पूर्वी गुजरात संघाने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजीचा निर्णय घेतला होता, पण त्याचा हा निर्णय मार्करम मिचेल मार्श जोडीने चुकीचा ठरवला. लखनऊच्या सलामी जोडीने पहिल्या विकेटसाठी ९१ धावांची दमदार भागीदारी रचली. मार्करम २४ चेंडूत ३६ धावा करून माघारी फिरल्यावर मिचेल मार्श अन् निकोलस पूरन ही जोडी जमली. दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी १२१ धावांची भागीदारी केली. मार्शने ६४ चेंडूत १० चौकार आणि आठ षटकारांच्या मदतीने ११७ धावांची खेळी केली. तो यंदाच्या हंगामात शतक झळकवणारा पहिला परदेशी खेळाडू ठरला. पूरनने २७ चेंडू केलेल्या नाबाद ५६ धावांच्या खेळीसह पंतने सहा चेंडूत केलेल्या १६ धावांच्या जोरावर लखनऊच्या संघाने दोन विकेट्सच्या मोबदल्यात धावफलकावर २३५ धावा लावल्या होत्या.

### ■ 'जीटी'चे टेन्शन वाढले

या सामन्यातील विजयासह उर्वरित सर्व सामने जिंकून गुजरात टायटन्सकडे २२ गुण मिळवत प्लेऑफमध्ये टॉपला राहण्याची संधी होती, पण लखनऊविरुद्धच्या पराभवामुळे त्यांचे टेन्शन वाढले आहे. आता ते फक्त २० गुणांपर्यंत पोहचू शकतात. दुसरीकडे बंगळुरू आणि पंजाब हे दोन संघ उर्वरित दोन सामने जिंकून गुजरात टायटन्सच्या पुढे निघून जाऊ शकतात. जर या दोन संघांनी एखादा सामना गमावला, तरच गुजरातला अव्वल दोनमध्ये राहून क्वालिफायर १मध्ये खेळता येईल.

# सूर्यकुमार यादवला खुणावतोय सचिनचा मोठा विक्रम!



**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२५मध्ये सूर्यकुमार यादवची बॅट चांगलीच तळपत आहे. विशेष म्हणजे त्याने यंदाच्या हंगामातील प्रत्येक सामन्यात २५पेक्षा जास्त धावा केल्या आहेत. आता त्याच्या निशाण्यावर सचिन तेंडुलकरचा १५ वर्षांपूर्वीचा सर्वात मोठा विक्रम आहे, जो तो मोडण्याच्या अगदी पोहचला जवळ आहे.

आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सकडून खेळताना एका हंगामात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावावर आहे. २०१०च्या आयपीएलमध्ये त्याने १५ सामन्यात ६१८ धावा केल्या. त्या वर्षी त्याने पाच अर्धशतके झळकावली. यादरम्यान, सचिनची सरासरी ४७.५३ होती आणि त्याने १३२.६१च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी केली. तेव्हापासून कोणीही हा विक्रम मोडू शकलेले नाही. तथापि, २०२३च्या आयपीएलमध्ये सूर्यकुमार यादव त्याच्या खूप जवळ पोहचला होता. त्या वर्षी सूर्याने १६ सामन्यांमध्ये ६०५ धावा केल्या, पण ६१८पर्यंत पोहचू शकला नाही.

या वर्षी सूर्यकुमार यादवने मुंबई इंडियन्ससाठी १३ सामन्यांमध्ये ५८३ धावा केल्या आहेत. त्याची सरासरी ७२.८७ आहे, तर जास्त स्ट्राईक रेट १७०पेक्षा जास्त आहे. लीग स्टेजच्या उर्वरित सामन्यांमध्ये त्याला अजूनही ६०० धावांचा टप्पा ओलांडण्याची संधी आहे. तेंडुलकरला मागे टाकण्यासाठी त्याला फक्त ३६ धावा हव्या आहेत, जे तो फक्त एका सामन्यात करू शकतो, परंतु जर त्याने धावा केल्या नाहीत, तर त्यानंतर पुढच्या सामन्यात त्याच्यासाठी ही संधी असेल.

### ऑरेंज कॅपच्याही शर्यतीत

विशेष म्हणजे सूर्यकुमार यादव ऑरेंज कॅपच्यादेखील शर्यतीत आहे. त्याच्यापुढे फक्त दोन फलंदाज आहेत. हे दोन्ही फलंदाज गुजरात टायटन्सचे आहेत. यात साई सुदर्शन ६१७ धावा करून पहिल्या स्थानावर आणि शुभमन गिल ६०१ धावा करून दुसऱ्या स्थानावर आहे. यानंतर सूर्यकुमार यादव तिसऱ्या क्रमांकावर आहे. या सर्व फलंदाजांचे संघ प्लेऑफमध्ये पोहचले आहेत.

# बिहारमध्ये घरी परतलेल्या वैभव सूर्यवंशीचे जोरदार स्वागत

**पाटणा : वृत्तसंस्था**

बिहारमधील १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीने आयपीएल २०२५मध्ये धमाकेदार फलंदाजी करून साऱ्यांचे लक्ष वेधले. सर्वात तरुण खेळाडू म्हणून राजस्थान रॉयल्सकडून त्याने आयपीएलमध्ये पदार्पण केले. संधी मिळताच वैभवने तुफानी फलंदाजी करून दाखवली. स्पर्धेनंतर वैभव सूर्यवंशी बिहारमध्ये त्याच्या घरी परतला. आयपीएलमधील यशानंतर वैभवचे त्याच्या घरी भव्य स्वागत करण्यात आले.

राजस्थान रॉयल्सने वैभव सूर्यवंशीला एक कोटी १० लाख रुपयांना खरेदी केले होते. राजस्थान संघ अतिशय वाईट पद्धतीने प्लेऑफमधून बाहेर पडला, पण या हंगामात भारतीय क्रिकेटला वैभवच्या रूपात एक धडाकेबाज खेळाडू मिळाला. बिहारच्या



वैभवने पदार्पणाच्या आयपीएलमध्येच साऱ्यांना अवाक् केले. राजस्थानचा संघ संघर्ष करत असतानाही वैभवने संपूर्ण हंगामात चांगली कामगिरी केली. त्यानंतर तो त्याच्या मूळ गावी ताजपूर (समस्तीपूर, बिहार) येथे परतला. तिथे त्याचे स्वागत हार घालून आणि केक कापून करण्यात आले.

दरम्यान, वैभवची भारताच्या १९ वर्षांखालील संघात निवड झाली आहे. हा संघ इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे.

## आयपीएलमध्ये निवड झाल्याचे सांगून क्रिकेटपटूची फसवणूक

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये खेळण्याचे प्रलोभन दाखवून १९ वर्षीय क्रिकटपटूची २४ लाखांची फसवणूक करण्यात आली आहे. कर्नाटकमध्ये राज्यपातळीवर खेळणाऱ्या राकेश यदुरेला राजस्थान रॉयल्सच्या संघात संधी देण्याचे सांगून सायबर चोरट्यांनी फसवणूक केल्याचे पोलिसांनी सांगितले.

बेळगाव जिल्ह्याच्या चिक्कोडी तालुक्यातील चिंचणी गावाचा रहिवासी राकेश यदुरेला राजस्थान रॉयल्सच्या संघात निवड झाल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर त्याच्याकडून पैसे उकळण्यात आले.

# विराट-रोहितनंतर कसोटी निवृत्तीच्या रांगेत शमीही?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टीम इंडियाचे दोन महान खेळाडू रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी नुकतीच कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. बीसीसीआय लवकरच इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी टीम इंडियाचा संघ निवडणार आहे. रिपोर्ट्सनुसार टीम इंडियाचा अनुभवी दिग्गज गोलंदाज मोहम्मद शमीला या दौऱ्यातून वगळले जाऊ शकते. तसे झाल्यास त्यालाही लवकरच कसोटी निवृत्तीची घोषणा करावी लागू शकेल.

बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाने भारतीय क्रिकेट बोर्डाला सांगितले आहे की, ३४ वर्षीय शमीला सध्या लांब स्पेल टाकण्यात अडचण येऊ शकते तसेच तो पूर्ण पाच



कसोटी सामने खेळण्याची शक्यता कमीच आहे. याच कारणामुळे बीसीसीआय त्याला दौऱ्यावर घेऊन जाण्यास इच्छित नाही. वृत्तानुसार निवडकर्त्यांना भारतीय संघात तंदुरुस्त गोलंदाजांचा समावेश करायचा आहे, जे गरज पडल्यास लांब स्पेल टाकू शकतात.

बोर्डातील एका सूत्राने सांगितले की, शमी आयपीएलमध्ये सनरायझर्स हैदराबादसाठी चार षटके टाकत आहे, पण बोर्ड आणि निवडकर्त्यांना माहीत नाही तो एका दिवसात १०पेक्षा जास्त षटके टाकू शकतो की नाही. इंग्लंडमध्ये वेगवान गोलंदाजांना लांब स्पेलसाठी विचारात घेतले जात आहे. अशा वेळी निवडकर्ते कोणतीही जोखीम पत्करू शकत नाहीत.

मोहम्मद शमी जवळजवळ दोन वर्षांपासून भारताच्या कसोटी संघाबाहेर आहे. त्याने जून २०२३मध्ये वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्ध शेवटचा कसोटी सामना खेळला. त्यानंतर २०२३च्या एकदिवसीय विश्वचषकात तो जखमी झाला आणि तेव्हापासून तो कसोटी संघाबाहेर आहे. दुखापतीनंतर त्याने या वर्षी टी-२० आणि एकदिवसीय संघात पुनरागमन केले.

शमीने चॅम्पियन्स ट्रॉफीदेखील खेळली, पण या काळात त्याची कामगिरी खूपच सामान्य होती. तो त्याच्या जुन्या लयीत दिसला नाही. तशातच आता वाढत्या वयामुळे त्याच्या आयपीएल कामगिरीमध्येही फरक जाणवला. त्याला या हंगामात त्याला नऊ सामन्यांत फक्त सहा विकेट्स घेता आल्या. या काळात त्याचा इकॉनॉमी रेटही (११.२३) खराब होता.

अशा परिस्थितीत अश्विन, रोहित आणि विराट या दिग्गज खेळाडूंसारखीच शमीवरही निवृत्ती जाहीर करण्याची वेळ येऊ शकते.

# मिचेल मार्शने शतकासह आयपीएलमध्ये जोडला नवा अध्याय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या यंदाच्या हंगामात लखनऊ सुपर जाएंट्सच्या ताफ्यातील सलामीवीर मिचेल मार्श याने गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्यात दमदार शतकी खेळी केली. तो यंदाच्या हंगामात शतक झळकवणारा पहिला परदेशी खेळाडू ठरला आहे. एवढेच नाही तर त्याच्या शतकी खेळीसह आयपीएलच्या इतिहासात नवा अध्यायही जोडला गेला. पहिल्यांदाच जगातील लोकप्रिय स्पर्धेत थोरल्या भावानंतर धाकट्या भावाच्या भात्यातून शतक पहायला मिळाले आहे.

लखनऊचा संघ यंदाच्या हंगामातून आधीच बाद झाला आहे, पण या संघाकडून मिचेल मार्शने सर्वोत्तम कामगिरी केली. गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्यात त्याने ६४ चेंडूत १० चौकार आणि आठ षटकारांच्या मदतीने ११७ धावांची खेळी केली. मिचेल मार्श हा अष्टपैलू खेळाडू आहे, पण दुखापतीतून सावरून आयपीएलमध्ये सहभागी



झाल्यामुळे त्याने गोलंदाजीपासून दुरावा ठेवत फक्त फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या शतकी खेळीसह लखनऊच्या ताफ्यातून सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तो दुसऱ्या स्थानावर पोहचला आहे. ११ सामन्यातील ११ डावात त्याने ५६० धावा केल्या आहेत. या यादीत लोकेश राहुल ६१६ धावांसह अव्वलस्थानावर आहे. अखेरच्या सामन्यात त्याला टॉप होण्याची संधी आहे. यासाठी त्याला ५७ धावांची खेळी करावी लागेल.

आयपीएलच्या पहिल्या हंगामात म्हणजे २००८मध्ये मिचेल मार्शचा मोठा भाऊ शॉन मार्श हा किंग्ज इलेव्हन पंजाब (सध्याचा पंजाब किंग्ज) संघाकडून खेळताना दिसला होता. या हंगामात त्याने एक शतक आणि पाच अर्धशतकासह हंगाम गाजवला होता. २०२५च्या हंगामात मिचेल मार्शने एक शतक आणि पाच अर्धशतकाच्या मदतीने आपली छाप सोडलीये. थोरल्यानंतर धाकट्या भावाने आयपीएलमध्ये शतक झळकवण्याची ही पहिलीच वेळ आहे.

## बेन डकेटचे शानदार शतक

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंड आणि झिम्बाब्वे या दोन्ही संघांमध्ये ४ दिवसीय कसोटी सामन्याचा थरार सुरू आहे. या सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना इंग्लंड संघाचा सलामीवीर फलंदाज बेन डकेटने झिम्बाब्वेच्या गोलंदाजांचा समाचार घेतला. त्याने अवघ्या १०० चेंडूत आपले शतक पूर्ण केले. हे त्याच्या कसोटी कारकिर्दीतील पाचवे शतक आहे, जे अतिशय खास ठरलं आहे.

बेन डकेटने पहिल्यांदाच मायदेशात खेळताना शतक झळकावले आहे. दुसरे म्हणजे त्याने दुसऱ्यांदा १०० किंवा त्यापेक्षा कमी चेंडूत आपले शतक पूर्ण केले आहे. बेन डकेट इंग्लंडकडून असा कारनामा करणारा पहिलाच फलंदाज नाही. यापूर्वी जॉनी बेअरस्टो, जॅक क्रॉली आणि हॅरी ब्रुक यांनीदेखील कसोटी क्रिकेटमध्ये असा कारनामा केला आहे.











दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com